MAHMARI 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा



वर्ष सतरावे / अंक ६ / जून २०१६

## संपादकीय

### सरकारीकरण-शिक्षणाचे

'प्रथम' ही शिक्षण क्षेत्रात काम करणारी संस्था गेली काही वर्ष प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा दर्जा तपासण्याचे काम करीत आहे. भाषा आणि गणित हे शिक्षणाकरिता अत्यंत महत्त्वाचे विषय. या दोन्ही विषयांतील दुसरी ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थांच्या क्षमतेची 'प्रथम' ची निरीक्षणे भीतीदायकच नाहीत तर भयानक आहेत. अलीकडे राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या वतीने अशीच पाहाणी करण्यात आली. थोडा फार फरक वगळला, तर या पाहणीतील निष्कर्षही तेवढेच गंभीर आहेत.

आठवीत शिकणाऱ्या ७८% विद्यार्थांची वाचन क्षमता ही दुसरीच्या विद्यार्थां इतकी आहे असे आढळून आले. तिसरीत शिकणाऱ्या ७% विद्यार्थांना साधी अक्षर ओळखही नाही, तर ४४% विद्यार्थांना १० ते ९९ हे आकडे पुरेसे ओळखता येत नाहीत. ९८% विद्यार्थांना भागाकार करता येत नाही. गणिताचा इतका कच्चा पाया घेऊन तिसरीतून ही मुलं कुठलीही परीक्षा न देता आठवीपर्यंत पोहोचतात. शिक्षणाचा अधिकार या क्रांतिकारक कायद्याने शिक्षणातील ही 'क्रांती' घडवून आणली आहे. गणिताचा हा क्रांतिकारक वारसा घेऊन विद्यार्थी पुढे दहावी-बारावीच्या परीक्षेला बसतात आणि याही पुढची मोठी 'क्रांती' म्हणजे या परीक्षांमधून ९०% विद्यार्थी उत्तीर्ण होतात.

कोकणामध्ये बाराविला ९६% विद्यार्थी ह्यावर्षी उत्तीर्ण झाले. अभियांत्रिकीच्या प्रवेशाकरिता मागासवर्गीय विद्यार्थांना ४५% तर खुल्या वर्गातील विद्यार्थांना पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र आणि गणितामध्ये कमीतकमी ५०% गुण असणे आवश्यक आहे. यालाही आता अनेक विषयांचे पर्याय देऊन ही पात्रता पूर्ण करण्याची विद्यार्थांना संधी देण्यात येत आहे. पण आडातच नसेल तर पोहऱ्यात तरी कुठून येणार? गुहागर तालुक्यातील अनेक कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी ९५% विद्यार्थी ही पात्रता आज प्राप्त करू शकत नाहीत. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शहरी भागातूनही अभियांत्रिकी करता पात्रता असण्याची क्षमता ३० ते ५० टक्के पर्यंतच आहे. ह्यात सर्वात गंभीर बाब म्हणजे, ५५ ते ६० टक्के मिळालेले अनेक विद्यार्थी पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र आणि गणित या विषयांमध्ये ४५ ते ५० टक्के गुण मिळवू शकलेले नाहीत. यामध्ये अंतर्गत मूल्यमापनाकरिता असलेले २०- २५ गुण हे बहुतेक विद्यार्थांना सगळेच्या सगळे मिळालेले असतात.

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

व्यावसायिक शिक्षणाकरिता सामूहिक प्रवेश परीक्षा महाराष्ट्रात घेतली जाते. 'बिचाऱ्या' विद्यार्थांच्या हिताकरता 'कनवाळू' सरकारनी ह्यावर्षी केलेले प्रयत्न आपल्या सर्वांना ठाऊकच आहेत.

आपण कोणाची फसवणूक करतोय?

आठवी पर्यंत विनाप्रयास शिक्षण घेतल्या नंतर नववीला अनेक विद्यार्थी परीक्षेला प्रथमच सामोरे जातात. यामध्ये विद्यार्थी अनुत्तीर्ण झाला की पालकांचे शाळांविरुद्ध आकांडतांडव सुरू होते. मग 'दयाळू' राजकारणी आणि न्यायालयांनाही या कोवळ्या मनांबद्दल 'कणव' येते. विद्यार्थाला, तू अभ्यास कर ही सांगण्याची क्षमता, आज शाळांनीच नाही तर पालकांनीही हरवली आहे.

पालकांना स्वतःच्या अनुभवावरून, स्पर्धेशिवाय जगात तरणोपाय नाही याची थोडीफारतरी जाणीव झालेली असते. या स्पर्धेला सामोरे जाण्याकरता मग आपल्या मुलाला किंवा मुलीला आइनस्टाईन बनवण्याची त्यांची धडपड चालू होत! यातच 'शिकवणी' वर्गाचा उदय आहे.


कितीही नावे ठेवली तरी या 'शिकवणी वर्गा'तील शिक्षक हे चांगलेच असायला लागतात. कारण तो 'शिकवणी वर्ग' हा शिक्षकाच्या चांगल्या शिकवण्यामुळेच नावारूपाला आलेला असतो. ऐरवी ३० मिनिटांचा वर्ग घेऊन 'बौद्धिक' आणि 'शारीरिक'दृष्ट्या क्षीण होणारा शिक्षक, शिकवणी वर्गात मात्र ८ ते १० तास 'उत्साह' आणि 'उमेदी'ने शिकवत असतो. शिकवणी वर्गात दिलेले 'गृहपाठ' आणि 'परीक्षा' हे विद्यार्थी आणि पालक वर्ग सुद्धा बिनबोभाट आणि आग्रहाने करीत असतात.

'शाळा' आणि 'शिकवणी वर्गा'मध्ये असणारा हा फरक समजावून घेणे, किंवा यासंदर्भात आत्मपरीक्षण करणे शिक्षणाच्या दृष्टीने हिताचे आहे. शालेय शिक्षणाने आपली विश्वासार्हता गमावली आहे हा त्याचा स्पष्ट अर्थ आहे. शिकवणी वर्ग बंद करून किंवा त्यावर 'नियंत्रणे' टाकून शाळेत दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा 'दर्जा' किंवा 'विश्वासार्हता' वाढणार नाही. शालेय शिक्षण जेव्हा शिकवणी वर्गाइतके किंवा त्याहीपेक्षा चांगले दिले जाईल, तेव्हा शिकवणी वर्गाचे अस्तित्व आपोआप संपुष्टात येईल.

जो प्रश्न शिकवणी वर्गाचा तोच प्रश्न 'मातृभाषे'तील शिक्षणाचा. निदान मुलभूत शिक्षण तरी मातृभाषेतूनच मिळायला हवे या संदर्भात शिक्षणतज्ज्ञांमध्येही जागतिक एकवाक्यता आहे. वास्तवामध्ये मात्र, निदान विकसनशील देशांमध्ये तरी परिस्थिती बरोबर याच्या उलटी आहे. महाराष्ट्रापुरते बोलायचे म्हटले तरी मराठी माध्यमाची आजची परिस्थिती ही शोचनीय आहे. शहरापुरत्या मर्यादित असलेल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा आता तालुका आणि गावांपर्यंत पोहोचल्या आहेत. इंग्रजी माध्यमाच्या शाळा काढायची परवानगी देण्यात आली ती विनाअनुदान तत्त्वावर. म्हणजे या शाळांमध्ये 'शुल्क' आकारले जाऊ लागले, तर सरकारी शाळांमधून कुठलेही शुल्क आकारले जात नाही. मायबाप सरकारला वाटले की 'फुकट' दिले की 'निमूट' घेतले. अर्थात लोकांनी 'दर्जेदार' शिक्षणाकरता शुल्क देऊन 'इंग्रजी' माध्यमांच्या शाळाच पसंत करायला सुरवात केली!

१९६० ते १९७० च्या दशकापर्यंत मराठी माध्यमाच्या शाळांमधूनच उत्तीर्ण होऊन बहुसंख्य विद्यार्थी महाविद्यालयामध्ये प्रवेश करीत होते. शाळांमधून इंग्रजी एक भाषा म्हणून आठवी नंतर शिकवली जायची, पण माध्यम हे मराठी असायचे.

(पृष्ठ क्र. ३८ वर)



# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष सतरावे / अंक ६ / जून २०१६

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २० वे/अंक १२ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | वारी कोपेनहेगनची | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | स्वदेशवेध-४ उडिशा | श्री. नरेंद्र गोळे | ८ |
| ४) | नर्मदा परिक्रमा (भाग : २८) | श्री. अरविंद ओक | १९ |
| ५) | ओळख वनस्पतींची-कांडोळ / भुताचं झाड | श्री. प्रकाश दुधाळकर | २३ |
| ६) | मराठी मुलुखातील मर्दानी योद्धा : श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | २५ |
| ७) | ऐच्छिक रक्तदान : निरोगी राहाण्याचे भान व गरजूंचे प्राण वाचविणारे वरदान | सौ. स्मिता अमोल लिमये | ३२ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३४ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- ❖ आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- ❖ हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- ❖ शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- ❖ आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- ❖ आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- ❖ आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- ❖ दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- ❖ आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- ❖ www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- ❖ वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- ❖ कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# वारी कोपेनहेगनची

*कोपनहेगन या शहरातील अनेक प्रेक्षणीय स्थळाची माहिती या लेखात दिलेली आहे. लेखक काही दिवसांपूर्वी तिथे स्वतः गेले होते. त्यामुळे हे अनुभवाचे बोल आहेत - संपादक*

कोपनहेगन हे युरोप खंडातील एक मोठे शहर आहे. डेन्मार्क देशाची राजधानी म्हणून हे शहर प्रसिद्ध आहे. या शहराला भेट देण्याची मला दोनदा संधी मिळाली. १९८८ च्या मार्च महिन्यात मी पहिल्यांदा या शहरात गेलो होतो. यूनेस्को या संघटनेने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय संमेलनात सहभागी होण्यासाठी मला निमंत्रण मिळाले होते. त्यानंतर एप्रिल २०१६ मध्ये म्हणजे तब्बल २८ वर्षानंतर पुन्हा एकदा या शहराला भेट देण्याची संधी चालून आली. यावेळी कारण अगदीच वेगळे होते. कोपनहेगन शहरात २२ ते २६ एप्रिल या कालावधीत तरुण शास्त्रज्ञांचा मेळावा भरविण्यात आला होता. या मेळाव्यात ठाण्याच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी होणार होते. त्यांना घेऊन जाण्याची जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली होती. तुर्कीश एअर लाईन्सच्या विमानाने आम्ही संध्याकाळी कोपनहेगन विमानतळावर पोहोचलो. हे विमानतळ एका बेटावर आहे. तेथून शहरात जाण्यासाठी रोड आणि रेल्वे मार्ग बांधलेले आहेत. यजमान मंडळी आम्हाला विमानतळावरच भेटली. त्यानी आम्हाला मेट्रोने राहायच्या ठिकाणी नेले.




**कोपेनहेगनचे विमानतळ**

यजमानांच्या सूचनेवरून फोरम नावाच्या स्टेशनवर आम्ही उतरलो. तेव्हा संध्याकाळचे सात वाजले होते. उदवाहनाने जेव्हा आम्ही वर आलो तेंव्हा आमच्या लक्षात आले की सूर्य क्षितिजापासून बराच वर आहे. आम्ही विषुववृत्तापासून दूर आणि उत्तर ध्रुवाजवळ असल्याचा हा परिणाम होता. सूर्य जेव्हा उत्तरायणात असतो तेंव्हा या परिसरात उन्हाळा असतो. या कालावधीत अठरा तासांहून जास्त काळ सूर्य आकाशात असतो. असे जरी असले तरी बाहेरचे तपमान मात्र बरेच कमी असते. स्टेशनच्या बाहेर पडताच त्याची आम्हाला जाणीव झाली. विमानप्रवासात आम्ही फारसे उबदार कपडे घातले नव्हते. विमानातून बाहेर पडून तसेच आम्ही मेट्रो रेल्वेत चढलो. त्यामुळे स्टेशनच्या बाहेर पडल्याबरोबर आम्हाला थंडीची जाणीव झाली. थंडीने कुडकुडतच मी सोबत असलेल्या मुलीला विचारले, 'काय तपमान असेल इथलं?' तिने सहज उत्तर दिलं, 'असेल दोन डिग्रीच्या आसपास.' आम्ही मुंबईहून प्रस्थान केले तेव्हा तेथले तपमान असेल सुमारे ३५ डिग्री. म्हणजे एकदम ३३ डिग्रीचा फरक. त्यामुळे आम्ही तिघेही भर उन्हात कुडकुडायला लागलो! आमची अवस्था बघून आम्हाला धीर देण्यासाठी सोबतच्या माणसाने सांगितले आपले हॉटेल जवळच आहे. त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून आम्ही आमच्या बॅगा खेचत झपाझप पावले टाकत त्यांच्या मागे चालू लागलो. त्यानी सांगितल्याप्रमाणे हॉटेल खरोखरच जवळ होते. वाटेत आम्हाला धातूचे तीन पुतळे लागले. मी त्यांचे पटकन छायाचित्र काढून घेतले. थोड्याच वेळात आम्ही हॉटेलजवळ पोहोचलो. त्यामुळे, लगेच आत प्रवेश करून थंडीपासून बचाव करू शकलो.

दुसऱ्या दिवशी कोपनहेगन दर्शनाचा कार्यक्रम होता. सकाळी नाश्ता करून आम्ही हॉटेलच्या बाहेर पडलो.



हॉटेलजवळ असलेले धातूचे तीन पुतळे

चालत चालत एका जुन्या चर्च जवळ पोहोचलो. त्याचे डॅनिश नाव काहीतरी वेगळेच आहे. परंतु मार्बल चर्च या नावाने ते प्रसिद्ध आहे. आमच्या यजमानांनी आम्हाला सांगितले की चर्चची इमारत १७४० मध्ये बांधली आहे. रोममधील सेंट पिटर्स या चर्चसारखी या चर्चची रचना आहे. इमारत दगडाची बनलेली असून सर्व बाजूंनी नक्षीकाम केलेले आहे. चर्चच्या आतला परिसर तर फारच विलोभनीय आहे. त्या ठिकाणी छायाचित्र काढण्याची इच्छा आवरता आली नाही.



चर्चची सुबक इमारत

चर्चचे दर्शन घेऊन आम्ही जवळच असलेल्या महालांच्या संकुलाकडे आपला मोर्चा वळविला. चारही बाजूंनी दगडांच्या इमारती आणि मध्यभागी मोठा मोकळा परिसर अशी व्यवस्था तिथे होती. त्या मोकळ्या जागेत आधीपासून काही लोक उभे होते. आम्ही देखील त्यात सामील झालो. विशिष्ट गणवेशातील रक्षक लोकांना दूर उभे राहायला सांगत होते. एकूण वातावरण असे होते की आता काहीतरी महत्त्वाचे घडणार असे वाटावे. आमच्या यजमानांनी आम्हाला आधी काहीच सांगितले नव्हते. ते देखील त्या गर्दीत सामिल होऊन काहीतरी घडण्याची उत्सुकतेने वाट बघत होते. थोड्याच वेळात बँड वाजल्याचा आवाज ऐकू येऊ लागला. आवाजाच्या दिशेने नजर टाकली तर त्या बाजूने काही घोडेस्वार येताना दिसले. त्यांच्या गणवेशावरून ते रक्षक वाटत होते. त्यांची जाण्याची दिशा राजवाड्यासमोर उभ्या असलेल्या रक्षकाकडे होती. त्यावरून हा 'रक्षक बदलाचा सोहळा' असल्याचे आमच्या लक्षात आले. आम्ही जेव्हा इंग्लंडला शैक्षणिक सहल नेतो तेव्हा तेथे बकिंगहॅम राजवाड्यात होणारा सोहळा सर्वांना दाखवतो. तसाच हा सोहळा असल्याचे माझ्या लक्षात आले. यापूर्वी मी जेव्हा कोपनहेगनला आलो होतो तेव्हा या सोहळ्याविषयी ऐकले होते. या भेटीत तो प्रत्यक्ष पाहण्याची संधी मला मिळाली होती.



रक्षक बदलाचा सोहळा

राजवाड्याजवळच एक कालवा आहे. कालवा आणि त्याच्या दुसऱ्या बाजूला असलेली सुबक इमारत आम्हाला खुणावत होती. पायी चालत आम्ही कालव्याच्या किनाऱ्यावर पोहोचलो. तेथे सुंदर बाग होती. बागेतील रंगीबेरंगी फुलांनी आणि त्यावर पिंगा घालणाऱ्या फुलपाखरांनी आम्ही चांगलेच सुखावलो. असे असले तरी आमचे लक्ष मात्र कालव्याच्या दुसऱ्या किनाऱ्यावर असलेल्या इमारतीकडे लागले होते. इमारतीची रचना काहीशी वेगळीच वाटत होती. आमच्या सोबत असलेल्या व्यक्तींकडे चौकशी केली असता ती ऑपेरा हॉऊसची इमारत असल्याचे आम्हाला कळले.

एव्हढे सगळे होईपर्यंत दुपारचा एक वाजला. त्यांच्या दृष्टीने ती जेवणाची वेळ होती. आमची मात्र दुपारच्या



**ऑपेरा हॉऊस**

न्याहारीची वेळ झाली होती. याचे कारण डेन्मार्क आणि भारत यामधील घडाळ्यात साडेतीन तासांचे अंतर आहे. खरे तर हे अंतर साडे-चार तासांचे आहे. परंतु उन्हाळ्यात सूर्य लवकर उगवत असल्याने युरोप मध्ये घड्याळ एका तासाने पुढे करतात. म्हणून वेळेतील फरक एक तासाने कमी होतो. स्पर्धेच्या आयोजकांनी राजवाड्याजवळच असलेल्या एका हॉटेलमध्ये जेवणाची सोय केली होती. युरोपीय जेवणाचा आनंद घेऊन आम्ही पुन्हा फिरस्तीला सुरुवात केली. चालत चालत आम्ही जेथे कालव्याची सुरुवात होते तेथे आलो. अबब! किती गर्दी? जणू गावातील सगळे लोक येथेच जमा झाले असे वाटावे. तेथे अनेक बोटी होत्या. काही जण बोटीत बसून फेरफटका मारून येत होते. काही जण कालव्याच्या किनाऱ्यावर नुसतीच भटकंती करीत होते. कालव्याच्या दोन्ही किनाऱ्यावर खाण्याची ठिकाणे होती. बरेच लोक तेथे खाण्यापिण्याचा आस्वाद घेत होते. आम्हाला येथे कशाला आणले असा प्रश्न माझ्या मनात आला. लगेच त्या प्रश्नाचे उत्तर देखील मिळाले. ते आम्हाला बोटीतून शहराचे दर्शन घडवू इच्छित होते. त्यासाठी त्यांनी ठरावीक वेळेला निघणाऱ्या बोटीची आमच्या सर्वांसाठी तिकीटे देखील काढली होती. बोट सुटायला अजून अर्ध्या तासाचा अवधी होता. तेव्हढ्या वेळात आजूबाजूला फिरून यायला हरकत नाही असे त्यांनी आम्हाला सांगितले. पडत्या फळाची आज्ञा मानून सगळेजण वेगवेगळ्या दिशेला गेले. मी मात्र वारा लागणार नाही अशी जागा शोधू लागलो. आम्ही सकाळी निघालो तेव्हा तापमान २ अंश सेल्सियस होते. त्यामुळे पुरेसे उबदार कपडे घालून आम्ही निघालो होतो. आतापर्यंत इमारतींनी वेढलेल्या जागेत फिरत होतो. त्यामुळे थंडी फारशी जाणवली नाही. परंतु आता उघड्यावर गार वारा अंगाला लागत असल्याने बोचरी थंडी जाणवू लागली होती. त्यापासून संरक्षण करण्यासाठी एखादा आडोसा शोधणे आवश्यक होते. अशी एक जागा शोधून मी अर्धा तास घालवला आणि ठरलेल्या वेळी सगळ्यांमध्ये सामील झालो.



**कालव्याच्या मुखाजवळ बोटींची गर्दी**

संपूर्ण बोट आमच्यासाठीच राखून ठेवली होती. आम्ही आपापल्या जागेवर स्थानापन्न होताच बोट निघाली. ती सावकाशपणे मार्गक्रमण करीत समुद्राच्या दिशेने निघाली. तेव्हा माझ्या लक्षात आले की ज्याला मी आत्तापर्यंत कालवा म्हणत होतो ती तर खाडी होती. कोपनहेगन शहर समुद्र किनाऱ्यावर वसलेले आहे. त्यामुळे खाडीचा काही भाग शहरात शिरलेला आहे. या खाडीच्या दोन्ही बाजूला चांगल्या इमारती बांधल्या आहेत. डेन्मार्कच्या राष्ट्रीय संग्रहालयाची इमारत याच खाडीच्या किनाऱ्यावर आहे. हे बांधकाम करणे सोईचे व्हावे यासाठी खाडीचे दोन्ही किनारे दगडाने पद्धतशीरपणे बांधून घेतले आहेत. त्यामुळे प्रथमदर्शनी, ही खाडी नसून मानवनिर्मित कालवा असावा असा आपला ग्रह होतो.

बोट जशी पुढे पुढे जाते तशी बोटचालक माहिती देत जातो. खाडीच्या दोन्ही बाजूला अनेक महत्त्वाची ठिकाणे आहेत. त्यामुळे त्याचे बोलणे चालूच असते. त्याने माहिती दिली की त्या वास्तूकडे पाहायचे आणि त्याचे छायाचित्र घ्यायचे असा आमचा क्रमच ठरून गेला.



खाडीकिनाऱ्यावर असलेल्या इमारती

काही अंतर गेल्यावर आम्ही आधी पाहिलेली ऑपेरा हाउसची इमारत दिसू लागली. आता मात्र आम्ही त्या इमारतीच्या अगदी जवळ होतो. आमच्यापैकी सर्वांनीच या इमारतीचे फोटो काढले. त्याहीपेक्षा कॅमेऱ्याचा जास्त वापर तेव्हा झाला जेव्हा आम्ही लिटल मरमेड या पुतळ्याजवळ पोहोचलो. हा पुतळा ब्रॉन्झचा असून कोपनहेगन शहराची ओळख आहे. अॅन्डरसन नावाचे एक प्रथितयश डॅनिश लेखक होते. त्यानी काही वर्षांपूर्वी एक कादम्बरी लिहिली होती. या कादम्बरीच्या पात्रावर आधारित एडवर्ड एरिक्सन या मूर्तीकाराने १९१३ मध्ये हा पुतळा बनविला. काही वर्षांपूर्वी या पुतळ्याची मोडतोड करण्यात आली होती. परंतु लवकरच त्याची डागडुजी करून त्याला मूळ स्वरूपात आणून ठेवले आहे. या पुतळ्याजवळ अनेक पर्यटकांनी आधीच गर्दी करून ठेवली होती. त्या ठिकाणाचे महत्त्व ओळखून आमच्या बोट चालकाने बोट काही क्षणासाठी पुतळ्याजवळ थांबवली. त्यामुळे आम्हा सगळ्यांना तेथे फोटो काढता आले.



लिटल मरमेडचा पुतळा

बोटीचा प्रवास साधारणपणे एक तास चालला. शहरात वळणे घेत खाडी पसरली आहे. त्याच्या वेगवेगळ्या शाखांचे दर्शन होईल अशा पद्धतीने बोटीचा मार्ग आखलेला आहे. या प्रवासात आमची बोट अनेक प्रकारच्या पुलांखालून गेली. काही पूल रूंद तर काही कमी रुंदीचे होते. तसेच काही लांबलचक तर काही कमी लांबीचे होते. प्रत्येक पुलाची रचना वेगवेगळ्या पद्धतीने केलेली होती. बांधकाम शास्त्रातील अभ्यासकाला हे पूल प्रत्यक्ष पाहणे म्हणजे एक पर्वणीच ठरावी एव्हढी त्यात विविधता होती. नमुन्यादाखल एका पुलाचा फोटो खाली दिला आहेत.



खाडीवरील एक पूल

बोटीतून शहराचे दर्शन झाल्यावर आम्ही शहराच्या बाजार परिसरात फेरफटका मारायला गेलो. युरोपातील इतर शहरांप्रमाणेच या शहराची रचना आहे. दोन्ही बाजूला दगडी इमारती आणि त्यामधून जाणारा अरुंद रस्ता अशी रचना आहे. इमारतीच्या तळमजल्यावर व्यवस्थितपणे दुकाने थाटलेली आहेत. आपल्याकडे जसे दुकानाचा विस्तार करून फूटपाथ अडविले जातात तसा प्रकार तिथे कोठेही आढळला नाही. दुकाना समोर असलेले फूटपाथ पायी चालणाऱ्या लोकांसाठी उपलब्ध होते.

डेन्मार्क हा देश युरोपियन युनियनचा सदस्य आहे. परंतु या देशाने युरोचा स्वीकार केलेला नाही. त्यांच्याकडे डॅनिश क्रोनर नावाचे नाणे चलनात आहे. अनेक दुकानमालक युरो स्वीकारतात. परंतु पैसे परत देताना मात्र क्रोनर देतात. रुपयाच्या दृष्टीने विचार करता क्रोनर महागच आहे. एका क्रोनरला आपल्याला दहा रुपये मोजावे

लागतात. त्यामुळे तिथे खरेदी करायची म्हणजे जास्त किंमत देऊन वस्तू घ्यायची असा अर्थ होतो. ते टाळण्यासाठी आम्ही फारशी खरेदी केली नाही. तरीही बाजारातून फिरण्याचा आनंद आम्ही मनसोक्त लुटला. हे सगळं होईपर्यंत संध्याकाळचे सहा वाजायला आले होते. तरीही सूर्य मात्र क्षितिजापासून कितीतरी वर होता आणि आणखी एक महत्त्वाचे ठिकाण पाहायचे राहिले होते. ते म्हणजे तिवोली पार्क.




**तिवोली पार्क**

कोपनहेगन शहरात तिवोली ॲम्युजमेंट पार्क नावाचे एक प्रसिद्ध ठिकाण आहे. १५ ऑगस्ट १८४३ साली या पार्कची निर्मिती करण्यात आली. जगातील सर्वात जुन्या पार्कपैकी हे एक आहे. मुंबईत जसे एस्सेल वर्ल्ड आहे तसेच हे कोपनहेगन शहरात असलेले मनोरंजनाचे ठिकाण आहे. मागच्या वेळी मी कोपनहेगनला आलो होतो तेव्हा हिवाळ्याचे दिवस होते. हिवाळ्यात या भागात मोठ्या प्रमाणावर बर्फ पडतो. त्यामुळे हिवाळ्याचे सहा महिने हे पार्क बंदच असते. उन्हाळ्याची चाहूल लागली की येथे हालचाल सुरू होते. मागच्या भेटीत या पार्कला मला भेट देता आली नाही याची खंत होती. त्याचबरोबर या भेटीत ते बघता यावे अशी मी आशा बाळगून होते. कर्मधर्म संयोगाने माझी ही अपेक्षा पूर्ण झाली. वेगवेगळ्या देशांतून तरुण वैज्ञानिक स्पर्धेत सहभागी होण्यासाठी येतील त्याना हे ठिकाण दाखविले पाहिजे अशी आयोजकांची इच्छा होती. त्यानुसार त्यानी पार्कमध्ये जाण्यासाठी प्रवेश तिकिटे घेऊन ठेवली होती. आकाशपाळणा, रोलर कोस्टर, वेगवान गाड्या अशा अनेक गोष्टी त्या पार्क मध्ये होत्या. त्याचा आस्वाद तरुण मंडळींनी घेतला. त्यांच्या सोबत आलेल्या वयस्कर मंडळीनी मात्र त्यांना झेपतील अशी ठिकाणे शोधली. त्या पार्क मध्ये नाटकाचे स्टेज उभारण्यात आले होते. त्या स्टेजवर नाटकांचे लहान लहान प्रवेश दाखविले जातात. या खेरीज काही संग्रहालये देखील तेथे होती. तेथे वयस्कर मंडळीनी आपला वेळ घालविणे पसंद केले. अशा प्रकारे आमच्या गटातील लहान थोर सर्वांनीच या पार्कचा आनंद लुटला.



**पार्कमधील नाटकाचा स्टेज**

सकाळी नऊ वाजता सुरू झालेली आमची सहल रात्री दहा वाजता संपली. वेळेतील फरकाचा विचार करता त्यावेळी भारतीय वेळेनुसार पहाटेचा दीड वाजला होता. झोपेची वेळ होऊन गेल्यामुळे डोळे झाकले जात होते. कधी एकदा हॉटेलवर जाऊन गादीवर पडतो असे झाले होते. तरीही एका शहरातील अनेक महत्त्वाची ठिकाणे पाहिल्याचे समाधान वाटत होते. हे स्वानुभवाचे बोल वाचकाना नक्कीच आवडतील याची खात्री वाटते.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे - ४२१२०४

●●●

# स्वदेशवेध-४ उडिशा

*उडिशा म्हणजेच ओरिसा या शहराचे वर्णन करणारा लेख - संपादक*

मी १८ ते २६ ऑक्टोबर दरम्यान ओरिसात, चिल्का सरोवराच्या कडेकडेने प्रवास केला. ओरिसातील प्रवासास उद्युक्त झाल्यापासून कशीकशी माहिती मिळत गेली, काय काय पाहावेसे वाटू लागले, तिथे काय काय पाहण्यासारखे आहे इत्यादी अभ्यासांचे फलित, तसेच प्रवासात काढलेली प्रकाशचित्रे आणि ओरिसाच्या भौगोलिक, नैसर्गिक व पर्यटनासंदर्भातील वर्तमान स्थितीबाबतच्या माझ्या आकलनाची ही कहाणी आहे.

ओरिसात काय आहे? ओरिसा वादळभूमी आहे. ओरिसा पुरातन मंदिरांची भूमी आहे. ओरिसात सम्राट अशोकाला विरक्तीचा मार्ग सापडला होता. बुद्ध धम्मातील शांतीसार गवसले होते. पण यांखेरीज ओरिसात जगातील सर्वात अनोखा नैसर्गिक आविष्कार आहे. तो म्हणजे चिल्का सरोवर महानदीचे मुख. जुलै २०१४ च्या अंकात मी केवळ ह्यावरच एक लेख लिहिलेला आहे.

आपण मराठी लोक ओरिसा म्हणतो. तिथले लोक 'उडिशा' म्हणतात. त्यांच्या बोलीभाषेतला 'ड'चा उच्चार 'र'च्या आसपासचा असतो. शिवाय 'स' ला 'श' म्हणायचीही प्रथा आहे. म्हणजे ते 'बडकूल' म्हणतात तेव्हा आपल्याला 'बरकूल' असे ऐकू येते. शिवाय 'उ' च्या जागी बंगाल्यांप्रमाणे 'ओ' म्हणायचीही प्रथा आहे. म्हणून आपल्याला ते ओरिसा म्हणताहेत असे वाटते. तलावाला आपण सरोवर म्हणतो, ते तलावाला 'ह्रदो' म्हणतात. चिल्का (याचा चिलिका असाही उच्चार प्रचलित आहे) सरोवर तिथले सर्वात मोठे 'ह्रदो' आहे. मात्र ते खाऱ्या पाण्याचे सरोवर आहे. 'उडिशा'तील सर्वात मोठे 'मधुर जल ह्रदो' 'अंशुपा' आहे. हे सरोवर कटक जवळ आठगढ इथे आहे. अर्थातच महानदीच्या कुशीत.

ओरिसाला जाणार हे ठरल्यावर कधी हा प्रश्न आला. ओरिसातील पर्यटनासाठी ऑक्टोबर ते मे हा काळ योग्य समजतात. मग दिवाळीच्या सुट्ट्यांचा मौसम सोयीचा ठरला. आठ दिवसच मिळत होते. ओरिसातील दक्षिण भाग, जो चिल्का सरोवराकाठी वसलेला आहे तो जास्त प्रगत, जास्त पर्यटकांना आकर्षित करणारा आणि जास्त सोपा आहे. ओरिसाच्या उत्तरेलाही मगरींसाठी प्रसिद्ध असलेले भीतरकणिका अभयारण्य, हत्ती व सिंहांसाठी प्रसिद्ध असलेले सिमिलीपाल अभयारण्य, ललितगिरी व रत्नगिरी ही बुद्धांची तीर्थक्षेत्रे, रौप्य कलाकुसरीचे माहेरघर आणि ओरिसाचे पुणे म्हणता येईल अशी सांस्कृतिक राजधानी 'कटक' इत्यादी अनेक पर्यटकप्रिय गोष्टी आहेत. पण उपलब्ध वेळेच्या मर्यादेत कुठल्यातरी एकाच दिशेचा प्रवास अर्थपूर्ण होण्यासारखा होता. म्हणून आम्ही जास्त चोखाळला गेलेला दक्षिणपंथ निवडला.

त्यात ओरिसाला जायचे म्हटल्यावर भुबनेश्वर, पुरी आणि कोणार्क तर पाहायलाच हवे. म्हणून उर्वरित दिवसांत चिल्का सरोवर सर्व बाजूंनी पाहावे असे वाटले. पुढे तप्तपाणीची माहिती समजली. मग त्याचाही समावेश झाला. एव्हाना ऋषीकुलया नदीच्या काठावरील एका पहाडावरच्या तरतारिणी मंदिराबाबतही माहिती समजली होती. मात्र वेळेअभावी तो कार्यक्रम वगळावा लागला. एवढे करूनही सातपाड्याला राहून नावेतून डॉल्फिन्स पाहण्याच्या कार्यक्रमावरही वेळेअभावी पाणीच सोडावे

लागले. तरीही सर्वसंमतीने खालील कार्यक्रम निश्चित झाला.

ओरिसा पर्यटन विकास महामंडळाची प्रवासी निवासांची एक मालिका (Orissa Tourism Development Corporation's Hotel Chain) आहे. त्यातील प्रवासीनिवासांना 'पंथनिवास' म्हणून ओळखले जाते. ओरिसा पर्यटन विकास महामंडळाने काढलेल्या निसर्ग पर्यटन सहलीचा कार्यक्रम स्वीकारून, आम्ही आठ रात्री आणि नऊ दिवसांचा आमचा ओरिसा पर्यटनाचा कार्यक्रम नक्की केला. यामध्ये पहिल्या दिवशी आम्ही भुबनेश्वरला येऊन तिथल्या पंथनिवासात राहणार होतो. त्या दिवशी 'एकम्रा हाट', 'राममंदिर' इत्यादी पाहण्याचा कार्यक्रम होताच. दुसऱ्या दिवशी बरकूलच्या पंथनिवासात पोहोचून जेवून मग बरकूलच्या जेटीवरून तीन तासांची स्वयंचलित नावेने सफर करणार होतो. तिसऱ्या दिवशी सकाळी नारायणी मंदिर, टंपारा सरोवर पाहात पाहात गोपालपूरला जाऊन किनारा बघणार होतो. सकाळी सूर्योदय पाहाणार होतो. मग चवथ्या दिवशी तप्तपाणीला जाऊन राहाणार होतो. कुण्ड पाहाणार होतो. स्नान करणार होतो. तिथले अभयारण्य, हरीणबाग (डिअरपार्क) पाहाणार होतो. पाचव्या दिवशी सकाळी चंद्रगिरी पाहून, दुपारी रांभाच्या पंथनिवासात जाऊन राहाणार होतो. सहाव्या दिवशी रांभाच्या चिल्का सरोवरात अडीच-तीन तासांचा फेरफटका स्वयंचलित नावेने घेऊन मग भुबनेश्वरच्या पंथनिवासात जाऊन राहाणार होतो. वाटेत खुर्दारोडवरच्या उदयगिरी व खंडगिरी लेण्या पाहण्याचाही विचार होता. सातव्या दिवशी पुरीच्या पंथनिवासात राहून जगन्नाथाचे दर्शन, किनारादर्शन आणि खरेदीची योजना होती. आठव्या दिवशी सकाळी कोणार्क मंदिर पाहून व दुपारी भुबनेश्वरचे नंदनकानन पाहून आमचा कार्यक्रम पूर्ण होणार होता. नवव्या दिवशी परतीचा प्रवास होणार होता.

**भुबनेश्वर**

हे ओरिसा कलेचे आगर आहे. भुबनेश्वरच्या रस्त्यांवरील दुभाजक असू देत, खासगी घरांकरता निवडलेले ग्रिलचे डिझाइन असू दे, रस्त्याकाठच्या दिव्यांकरता निवडलेले कलापूर्ण खांब असू देत, मोहक वक्ररेषा आणि बारीक-बारीक कलाकुसर मनाला सारखी मोहवत राहाते. जरी आम्ही आमच्या पर्यटनात रुपेरी तारेच्या अलंकारांचे माहेरघर 'कटक' समाविष्ट केलेले नव्हते, तरी तसल्याच पितळी तारेच्या कलाकुसरीच्या वस्तूंनी 'एकम्रा हाटा'त आमचे लक्ष वेधून घेतले होते. 'एकम्रा हाट' हे उडिशा सरकारने भुबनेश्वरला उभारलेले एक कायमस्वरूपी हस्तकला प्रदर्शन आहे. पर्यटकाने खरीददारीत रुची नसली तरी अवश्य पाहावेच असे आहे. भुबनेश्वरच्या बिजू पटनाईक विमानतळापासूनच उडिया कलात्मकतेचे दर्शन होऊ लागते. एकम्रा हाटातील स्वागत कक्षात ते अधिकच प्रकर्षाने प्रकट होते. ओरिसा सरकारच्या अधिकृत प्रवासी निवासांना (हॉटेलांना) पंथनिवास म्हणतात. सर्वच पंथनिवासांतील खोल्या बैठकीच्या सामानांनी (फर्निचरने) सुसज्ज असत. पंथनिवासातील उपाहारगृहा (रेस्तराँ) मध्ये परवराच्या कापांना बेसन लावून तळलेले काप क्षुधोत्तेजक (स्टार्टर्स) म्हणून देत असत. ही पाककृती (रेसिपी) आम्हाला बेहद्द आवडे. याला ते लोक 'परवर भाजा' म्हणत.



राजाराणी मंदिर भारतीय पुरातत्त्व विभागाचे ताब्यात आहे. त्यांच्या ताब्यातील अत्यंत सुव्यवस्थित स्मारकांचे (मॉन्युमेंट्स) हे एक उदाहरण आहे. हल्ली ओरिसात राजाराणीय म्हणून ओळखल्या जात असलेल्या वालुकाश्माने हे मंदिर बांधण्यात आलेले आहे. सध्या त्यात मूर्ती नाही. मात्र ती शिवाची मूर्ती वा लिंग असावे, याचे पुरावे बाह्य बांधकामात सापडत असल्याचे भारतीय पुरातत्त्व खात्याच्या पुस्तकात म्हटले आहे. कदाचित या मंदिरावरूनच या प्रकारच्या दगडांना राजाराणीय म्हणू लागले असावेत. डौलदार बांध्याच्या देखण्या नर्तिका आणि दिक्पाल हे राजाराणी मंदिराचे वैशिष्ट्य आहे. सलग दगडातून कोरून काढलेल्या उभ्या कलात्मक गजांच्या खिडक्या हेही एक वैशिष्ट्यच म्हणावे लागेल. त्या खिडक्यांमुळे, मंदिराला खऱ्याखुऱ्या वास्तवास, दगडात साकार करण्याचे श्रेय लाभते. खिडकीच्या प्रत्येक गजावरील नक्षी निराळी असून, सहज नजरेत भरते.

उदयगिरी आणि खंडगिरी या दोन जवळजवळच्या टेकड्यांवरील लेण्या, भुबनेश्वरच्या नैऋत्येकडील खुर्दा मार्गावर शहराबाहेर आहेत. उदयगिरी भारतीय पुरातत्त्वखात्याच्या अखत्यारीत असून त्यावर चढण्यास तिकीट आहे. त्यावर चढल्यावर तिथून खंडगिरीची टेकडी दिसते. ओरिसात जागोजागी दिसणाऱ्या पांढऱ्या चाफ्याचा विशाल वृक्ष, उदयगिरीच्या जिन्याकाठीही आहे. खंडगिरीवरूनही उदयगिरीच्या लेण्या दिसतात.

मुक्तेश्वर मंदिर, सिद्धेश्वर मंदिर, लिंगराज मंदिर ही सगळी मंदिरे आसपासच आहेत. लिंगराजमंदिरात फोटोग्राफीस मनाई आहे. सिद्धेश्वर मंदिराला सलग दगडातून कोरलेल्या खिडक्या आहेत. त्या म्हणजे कोरीव खिडकीकलेतील कमालच आहे. नागकन्यांचे स्तंभ आणि भूमितीय आकृत्यांची नक्षी जागोजाग दिसून येते. नागकन्यांची कमनियता नेत्रदीपक आहे. सिंहाचे हत्तीवर वर्चस्व दाखवणारी शिल्पे दारांवर दिसून येतात. ती बुद्ध धर्मावर हिंदू धर्माने मिळवलेल्या विजयाचे प्रतीक मानली जातात.




**सिंहाचे हत्तीवर वर्चस्व दाखवणारी शिल्पे दारांवर दिसून येतात. ती बुद्ध धर्मावर हिंदू धर्माने मिळवलेल्या विजयाचे प्रतीक मानली जातात.**

भुबनेश्वर, खुर्दा, बरकूल, रांभा, गोपालपूर या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५ च्या दोन्ही बाजूस नजर पोहोचेतोवर भाताची शेती पसरलेली आहे. हिरव्या पोपटी रंगाच्या सर्व छटांनी समृद्ध हिरवाईने डोळे निवतात. क्षितिजापर्यंत पसरलेल्या भातशेतीमधून सरळसोट जाणारा रस्ता आकाशातून पाहताना 'नो एंट्री' च्या चिन्हासारखा दिसत असावा. राष्ट्रीय चौपदरी महामार्गाचा तो एक हिस्सा असल्याने त्याचे कॉंक्रीटीकरण सुरू आहे. जिथे कॉंक्रीटीकरण झालेले आहे तिथे रस्त्याची अवस्था छानच आहे. एरव्ही अतिशय खराब.

बरकूलच्या पंथनिवासाचे कार्यालय म्हणजे एक कौलारू टुमदार बंगला होता. मात्र, आम्ही राहिलो ती इमारत जुन्या प्रकारची सिमेंट कॉंक्रीटची दुमजली इमारत होती; जिच्या वरच्या मजल्यावर आम्ही राहिलो. उतरायला सरळसोट उतरता जिना दाराबाहेरच होता. जिन्याच्या चौकातून समोरचे धाब्याचे घर व्यवस्थित दिसे. उपाहारगृह दूरवर होते. त्याच्यामागे वरकरणी तंबूसारखी दिसणारी सिमेंट कॉंक्रीटची टुमदार घरे ओरिसा पर्यटन विकास महामंडळाची सुट्टीकालीन घरे (हॉली-डे होम्स) होती.

## बरकूल




मात्र सकाळी जेव्हा आम्ही जलप्रवासाला बाहेर पडलो होतो तेव्हा सूर्य तळपत होता. ऊन लागू नये म्हणून आम्ही डोक्याला फडकी ओली करून बांधलेली होती. त्यातही उकाडा होऊन फडके उतरवावे लागे. सभोवताल क्षितिजापर्यंत हिरवेगार पाणी दिसे. क्षितिजापर्यंत वर्तुळाकार कुठल्याही दिशेला किनारा दिसू नये एवढा चिल्का सरोवराचा विस्तार भव्य आहे. पावसाळ्यात एकूण १,१६५ वर्ग किलोमीटर्स एवढे विस्तृत क्षेत्र या जलाशयाने व्यापलेले आहे.

बंधाऱ्याने बंदिस्त केलेला भाग



बंदिस्त भागाचे मुख



बरकूलच्या पंथनिवासा पाठीमागे असलेल्या जेटीवरून आपण नेहमी चित्रात पाहातो तसल्या बदक, राजहंस इत्यादी आकारांच्या सुरेख नावा जलाशयात बांधून ठेवलेल्या दिसत. तिथे विस्तीर्ण चिल्का सरोवराचा साधारणतः एखाद किलोमीटर व्यासाचा भाग दगडमातीच्या बंधाऱ्याने बंदिस्त केलेला आहे. त्याला मुख्य जलाशयात शिरण्यासाठी एक तोंड होते. मुखातून लांबवर प्रवास करणाऱ्या स्वयंचलित होड्या व पडाव बाहेर जाऊ शकतात. उडिशा शैलीचे शिकारा (छताच्या नावा) मात्र या पाळीच्या मर्यादेतच प्रवाशांना फिरवून आणतात. त्यांच्या फेरीची वेळ संध्याकाळची ठरवलेली असते. गुडूप अंधार, निरव शांतता आणि वेड लावणारे गार वारे, अशात केवळ एक नावाडी तीन-चार प्रवाशांना छताच्या नावेत बसवून, बांबूने वल्हवत साधारणतः तासाभराचा फेरफटका, बंदिस्त जलाशयात, बांधाच्या काठाकाठाने घडवून आणतो. हा अनुभव आमच्यासाठी अविस्मरणीय ठरला. जलाशयाची खोली कुठेही दहा पंधरा फुटांहून जास्त नसली, तरीही बांबूच्या एका वल्ह्यासरशी हळूच, नाव बरेच अंतर पार करून नेण्याचे कसब आश्चर्यकारक होते.

बरकूलमध्ये स्वयंचलित होडीने चिल्का सरोवरात दूरवर फेरी करून कालीजय मंदिराचे बेट आणि नालबन नावाचे बेट दाखवले जाते. कालीजय बेटावर एक विहीर होती. बेटावर आम्हाला एक सौर दिवाही पाहायला मिळाला. भारत सरकारच्या, अपारंपरिक, पुनर्नविनीक्षम, ऊर्जास्त्रोतांच्या खात्यात आमचे वैदर्भीय मंत्री विलास मुत्तेमवार साहेब आल्यापासून, अशा गोष्टींकडे आमचे हमखास लक्ष जाते. कालीजय मंदिराची एक कथा पर्यावरणीय प्रशिक्षण केंद्राने (Enviromental Education Center) तिथे एका फलकावर नोंदवून ठेवलेली आहे.




**बरकूलची स्वयंचलित होडी, वनखात्याच्या शेवाळ-भेदक होड्यांनी निर्माण केलेल्या कालव्यांतून नालबनात पोहोचली. दुसऱ्या चित्रात दिसत आहे उडिया शैलीचा शिकारा**

नालबनात आम्ही पोहोचलो ते वनखात्याच्या शेवाळ-भेदक होड्यांनी निर्माण केलेल्या कालव्यांतून. उन्हाळ्यात पाण्याची पातळी खालावते तेव्हा हे सारे कालवे कोरडे पडून मोठे विस्तीर्ण बेट दिसू लागते, असे नावाडी सांगत होता. आम्ही मात्र ज्या निरीक्षण घराच्या पडवीतून आजूबाजूचा पाण्यात बुडालेला परिसर पाहात होतो त्या निरीक्षणघरापुरतेच ते बेट सीमित झालेले दिसत होते. नाव मनोऱ्याच्या चौथऱ्याशी उभी करून आम्ही वर निरीक्षण करण्यास गेलो.

सभोवताली सर्व पाणथळ भाग दिसत होता. कुठे कुठे जमिनीत रोवलेल्या बांबूची टोके वर दिसत. त्यावर पाण्यात बुडी मारून नुकतीच माशाची शिकार साधलेले पाणकावळे पंख सुकवताना दिसत. या व्यतिरिक्त एक मोठा करकोचा आणि एक भला थोरला बगळाच काय तो पाहाता आला. नाही म्हणायला छोटे छोटे पक्षी, टिटव्या दर्शन देत होत्याच. जानेवारीत इथे स्थानांतर करणारे लाखो पक्षी येतात, असे जरी सारखे ऐकत आलेलो असलो तरी सध्या ऑक्टोबर अखेरीस मात्र अगदीच तुरळक आणि लहान सहान पक्षी आसपास दिसून येत होते.



कालीजय मंदिर



पक्षी निरीक्षण घर, नालबन

कालीजय मंदिराची कथा आणि अग्नीपंखी पक्ष्यांचे सैन्य परिकुडा वंशाच्या भागीरथी मानसिंगाच्या कारकीर्दीत, खुर्दाच्या राजाने मानसिंगाशी युद्ध पुकारले. पराभवाच्या नामुष्कीतून सोडवण्यासाठी, मानसिंगाने कालीदेवीची प्रार्थना केली. लढाई सुरू होण्याआधीच अग्नीपंखी पक्ष्यांचा मोठा थवा उपजीविकेच्या शोधात, युद्धभूमीजवळच येऊन दाखल झाला. खुर्दाचा राजाससैन्य येऊन पोहोचला. त्याला वाटले की हे मानसिंगाचेच सैन्य असले पाहिजे. त्यांच्या प्रचंड संख्येपुढे आपले सैन्य टिकाव धरणार नाही असे वाटून तो तसाच माघारी परतला! अशाप्रकारे अग्नीपंखी पक्ष्यांची कुमक येऊन पोहोचल्यानेच मानसिंगाचा पराभव टळला. त्या पक्ष्यांना कालीदेवीनेच पाठवले असावे असा मानसिंगाला विश्वास होता. तेव्हापासून त्याच्या राज्यात कालीजय देवीची पूजा केली जाते. ते बेटही 'कालीजय बेट' म्हणूनच ओळखले जाते. मंदिराच्या आसपास हरतऱ्हेची दुकाने प्रसादाचे, कलाकुसरींचे ऐवज मांडून थाटलेली होती.

**गोपालपूर**

बरकूलहून गोपालपूरला जातांना आम्हाला वाटेत नारायणी मंदिर आणि टंपारा सरोवर पाहायचे होते. नारायणी मंदिरात छोटिशी टेकडीच चढून जायची असल्याने आमच्या चक्रधारीने (म्हणजे शुद्ध मराठीत ड्रायव्हर) चपला घालूनच जाण्याचा सल्ला दिला. मात्र मंदिराच्या बऱ्याच आधी चपला-बूट काढून ठेवावे लागले. पुढेही बरेच चालायचे होते. आमचे 'देह देवळात आणि चित्त खेटरात' असे झाले होते! नारायणी आणि ठाकुरजींचे दर्शन करून आम्ही एका वेगळ्याच मार्गाने खाली उतरत होतो. तेव्हा आता आपली चपला-बुटांशी नक्की फारकत होणार असे वाटले. पण आश्चर्यकारकरित्या आम्ही जिथे चपला-बूट काढलेले होते तिथेच पावते झालो. महागाईची पादत्राणेही जशी आम्ही ठेवलेली होती तशीच होती. जे आमच्या मनात होते, ते त्या स्थानिक लोकांच्या आचरणातही नव्हते. त्यामुळे मनाला आपलीच लाज वाटली. नारायणी मंदिरात एका झाडाला कंकण बांधून वरदान मागण्याची प्रथा आहे. मी सांगितले गेले त्याप्रमाणे कंकण बांधून परत आलो. मात्र, आल्यावर वरदान मागायची गोष्ट समजल्यामुळे कुठलेही वरदान मागितलेलेच नव्हते. आता देवी नारायणी आणि देव ठाकूरजी सर्वज्ञानी असल्यामुळे त्यांनी आमच्या व्यथा,

सुखी जीवनाची गुरुकिल्ली म्हणजे पाप होईल इतके कमावू नये, आजारी पडू इतके खाऊ नये, कर्ज होईल इतके खर्चू नये, आणि भांडण होईल इतके बोलू नये!

समस्या परस्पर दूर केल्या असणारच ह्यावर आमचा विश्वास आहे. एरव्ही आमचे 'उडिशा'दर्शन विघ्नविहीन, सुरळीत संपन्न होते ना!



ज्या कारणाने महानदीच्या मुखाशी चिल्का सरोवर निर्माण झालेले आहे त्याच कारणाने ओरिसातील बव्हंशी सर्व प्रमुख नद्यांच्या मुखाशी पाण्याची विशाल सरोवरे निर्माण झालेली आहेत. ऋषीकुलया नदीच्या मुखाशी झालेल्या सरोवरास 'टंपारा' म्हणतात. टंपारा सरोवरास आम्ही भेट दिली तेव्हा दुपारी ११-१२ चा सुमार असावा. तिथे वाऱ्यावर चालणाऱ्या शिडाच्या होड्या कशा चालवाव्यात याचे प्रशिक्षणवर्ग सुरू होते. किनाऱ्यावरून जीवनरक्षक बंडी (लाईफ जॅकेट) घालून होडीच्या उथळ शिंपल्यागत दिसणाऱ्या फळकुटावर उतरून शीड उभारतांना आम्ही प्रशिक्षणार्थी पाहिले. सरोवरात शिडाच्या अनेक होड्या विहरत होत्या. मात्र शीड उभारताच प्रवाहित होणाऱ्या होड्या परतताना परततात कशा? का त्या उचलून आणतात? ह्या मनातील प्रश्नांचे उत्तर शोधायला आम्हाला पुरेसा वेळ सापडला नाही.



गोपालपूरचा समुद्रकिनारा अतिशय प्रसिद्ध आहे. दीपगृहाजवळ दिसणारी हिरवाई म्हणजे ओबेराय हॉटेलचा हिरव्या वनश्रीने नटलेला परिसर आहे. मग युथ होस्टेल्स असोसिएशन ऑफ इंडिया आणि त्यानंतर पंथनिवास, एकास एक लागूनच आहेत. पंथनिवासाच्या (समुद्रकिनाऱ्याकडे तोंड करून उभे राहिले असता) डाव्या बाजूकडे थोडेसे चालून गेल्यावर गोपालपूरचा सार्वजनिक किनारा दिसतो. या किनाऱ्याच्या बांधीव पायऱ्यांनी वर चढून गेल्यावर एका बाजूला मत्स्यकन्येचे तर दुसऱ्या बाजूला गोगलगाईचे दगडी शिल्प उभारलेले आहे. ते दृश्य लागलीच लक्ष वेधून घेते. सगळ्याच परिसरातून दीपगृह सतत दिसतच राहाते. संध्याकाळी आम्ही पंथनिवासाच्या खासगी किनाऱ्यावर खूप विहरलो. मग आम्ही आळीपाळीने फोटो काढत, लाटांसोबत पायाखालच्या सरकत्या वाळूचा मनसोक्त अनुभव घेतला. फिरत-फिरत आम्ही गोपालपूरच्या सार्वजनिक किनाऱ्यावर गेलो. तिथल्या मत्स्यकन्या आणि गोगलगाय यांच्या शिल्पाकृती नजरेत न भरत्या तरच नवल. दुसऱ्या दिवशी आम्ही गोपालपूरच्या किनाऱ्यावरून सूर्योदय अनुभवला. किनाऱ्यावर एका दोऱ्यास आमिष बांधून, समुद्रात खोलवर जाऊन ते तिथे टाकून ठेवून, लाटेच्या पाण्यासरशी ओढून बारकाले मासे पकडणारे कोळी दिसत. साऱ्या जगाच्या व्यवहारांपासून अलूप, बेदखल राहूनही अशाप्रकारे उपजीविका मिळवणाऱ्या कोळ्यांचे मला कौतुक वाटले. ते कुणावरच अवलंबून नव्हते. दर्यादिल सागर त्यांच्या किमान गरजा सहज पुरवण्यास समर्थ होता.

**तप्तपाणी**

तप्तपाणीला वज्रेश्वरीसारखे गरम पाण्याचे झरे आहेत. मात्र, तप्तपाणी हे एक अभयारण्यही आहे. अभयारण्यातील अतिथी-निवासा (गेस्ट- हाऊस)सारखे, इथे पंथनिवास वसलेले आहे. पहिल्यांदा आम्हाला एका काष्ठ-कुटीत (लॉग- हाऊस) मध्ये जागा दिली होती. तिथे एक डिस्कव्हरीतल्यासारखा कोळी दिसला. पहिल्यांदा तो खोटाच वाटला. मग फुलपाखरू खातांना दिसला तेव्हा

खरा असल्याची खात्री पटली. तिथल्या बगीच्यात अनेकानेक प्रकारचे गुलाब होते.

पंथनिवासात गरम पाण्याच्या कुंडातील पाणी आणून आंघोळीच्या हौदात भरण्याची सोय केलेली होती. आत सर्वत्र गंधकाचा गंध आणि वाफ परिमळत होती. कपडे ठेवायला जरा दूर दांडी होती. पाणी बऱ्यापैकी स्वच्छ असल्याने पायऱ्यांवर पाण्याची पातळी सहज कळून येत नव्हती.



बाहेर एका ठिकाणी वेणीच्या पेडांसारखी दिसणारी पाने होती. आवाराबाहेर गवताने शाकारलेल्या तीन झोपड्या दिसत होत्या. ओरिसातील प्रवासात अनेक अतिप्रचंड वड दिसत. त्यातलाच एक त्या झोपड्यांशेजारी आढळला होता.

पंथनिवाससमोरच्या रस्त्यावरच समोरच्या बाजूला थोड्या वरच्या बाजूस तप्तपाणीचे प्रसिद्ध कुंड होते. ओरिसातील प्रथेप्रमाणे त्या मंदिरास एक सिंघद्वार (मुख्यद्वार, महाद्वार) होते. आतमध्ये एक शिवमंदिर आणि एक प्रचंड वृक्ष होता. पुढे एक दुर्गा-काली मंदिर व शेजारीच ते तप्तपाण्याचे कुंड होते. कुंडातून बाहेर पडणारे पाणी एका बाजूस एका पाईपद्वारे एका मोरीत सोडलेले होते, जिथे पाय धुण्याची, ते पाणी भरून नेण्याची सोय होती. दुसऱ्या बाजूस ते पाणी एका हौदात भरून स्नानाची सोयही केलेली होती. दुसऱ्या दिवशी आम्ही चंद्रगिरीस तिबेटी निर्वासितांच्या छावणीस भेट देण्यास गेलो होतो. तिथे आमची कर्मा लामा यांच्याशी भेट झाली.

तप्तपाणीहून चंद्रगिरीला जातांना राज्य महामार्ग क्रमांक १७ आणि ३४ यांचेवरून प्रवास करावा लागतो. रस्त्याच्या दुतर्फा आंबा, चिंच, सुवर्णचंपक, पांढरा चाफा, वड, पिंपळ इत्यादी विशाल वृक्षांच्या रांगा आहेत. वड तर इतके विस्तारलेले आहेत की मूळ खोड कुठले आणि पारंबी कुठली हे ओळखता येऊ नये. भवताली हिरवीगार शेते. त्यात भात व मका शेती, आणि केळी व पेरू इत्यादींचे मळे आहेत. अनेक घरांतून अंगणात मक्याची कणसे सोलून वाळत घातलेली दिसून आली. गवताने शाकारलेली घरे, शेळ्या, गाई, म्हशी यांचे कळप आणि ते हाकत जाणारे गुराखी. गुराखीही एक तालपत्रांची विणलेली टोपी घालून उन्हापावसांपासून स्वतःला वाचवतांना दिसत होते.



**तिथे एक ताल वृक्ष दिसला ओरिसात तालपत्रांच्या टोप्या, तालपत्रांची घरे, शिवाय तालपत्रांवर कोरलेली रंगचित्रे इ. पाहिलेली असल्याने तालवृक्ष जवळून पाहण्याचे कौतुक पुरे करून घेतले.**












**रांभा**

रांभाच्या रस्त्यावर आम्हाला बकऱ्या, गाई, म्हशींचे कळप दिसत. त्यांचे गुराखी तालपत्राने विणलेल्या विशिष्ट प्रकारच्या टोप्या घालत.

रांभा हे चिल्का सरोवराकाठचे, पूर्व किनारी रेल्वेचे एक स्टेशन आणि राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५ वरचे एक शहर आहे. इथे पंथनिवास असून त्याचेपासून चिल्का सरोवरात स्वयंचलित नावेने फेरफटका मारता येतो. इथे हवामानखात्याची एक प्रयोगशाळा असून हवामानविषयक मापने करण्याची सोय आहे. इथेच आम्हाला भारतीय संचारनिगमचे विनिमयकेंद्र आणि मनोराही आढळला. आम्ही इथल्या पंथनिवासात एक दिवस मुक्काम केला होता आणि सकाळच्या सुमारास स्वयंचलित नावेने ब्रेकफास्ट आयलँड, घण्टशिलाचा डोंगर, बर्डस् आयलँड आणि हनिमून आयलँड इत्यादी, चिल्का सरोवरातील चार बेटांवर फेरफटका करून आलो.

रांभाच्या जेटीच्या टोकाशी बोटींत चढ-उतार करण्यासाठी सिमेंट काँक्रीटचे व्यवस्थित जिने बांधलेले होते. आम्ही नावेत बसलो खरे. मात्र, लगेचच भुरूभुरू पाऊस सुरू झाला. वातावरण ढगाळलेलेच होते. गार वारे सुटले. आणि थंडी वाजू लागली. मग आम्ही ब्रेकफास्ट बेटाकडे वाटचाल करू लागलो. बेटाच्या नावाखातर एक मनोरा आणि एक छोटीसे खोलीवजा बांधकामच काय ते दिसत होते. दूरवरून पांढऱ्या ठिपक्यासारखे दिसणारे बांधकाम जवळ आल्यावर असे दिसू लागले. उन्हाळ्यात पाणी उतरल्यावर त्याच्याभोवतीचे बेट वर येऊन दिसू लागते असे नावाडी सांगत होता. मनोऱ्याजवळच्या चौथऱ्यावरील दगडाला होडी बांधून आम्ही वर चढलो. एव्हाना पाऊस थांबला होता. खोलीच्या मनोऱ्याकडील बाजूला दार, म्हणजे त्या आकाराचा उघडा भाग होता. तर इतर तीन बाजूंना उभट आयाताकृती झरोके होते. एकातून बर्डस आयलँड दिसे तर दुसऱ्यातून हनिमून आयलँड. तिथून उतरून आम्ही मनोऱ्याकडच्या बाजूच्या डोंगरातील घण्टशिलाच्या गुहेकडे निघालो. गुहेत एक हार घातलेला फोटो होता. वर चढून गेल्यावर वरल्या अंगाने बाहेरही पडता येत असे. आम्ही मात्र पुन्हा माघारी परतलो. होता होता आम्ही बर्डस आयलँडजवळ पोहोचलो. ते पाहिले. स्थलांतरित पक्षी मात्र मुळीच दिसले नाहीत. ते डिसेंबरनंतर येतात असे समजले.

आता आम्ही बर्डस आयलँड मागे टाकून हनिमून आयलँडकडे निघालो होतो. मग हनिमून आयलँड दिसू लागले. जेटी बांबूंचीच बनवलेली आहे. तिथे एक ताल वृक्ष दिसला. ओरिसात तालपत्रांच्या टोप्या, तालपत्रांची घरे, शिवाय तालपत्रांवर कोरलेली रंगचित्रे इत्यादी पाहिलेली असल्याने तालवृक्ष जवळून पाहण्याचे कौतुक पुरे करून घेतले. काही तालपत्रेही तोडून सोबत घेतली. आपल्याला कोरीव काम करता येते का ते बघायला!

हनिमून आयलँड हे चिल्का सरोवरातील एका मोठ्याशा बेटाचे नाव आहे. ओरिसा पर्यटन विकास महामंडळाने इथे सिमेंटचे चौथरे बांधून, त्यांचेवर कायमस्वरूपी लोखंडी पाईपचे सांगाडे उभारून ठेवलेले आहेत. म्हणजे वर कापड पसरले की तंबू तयार. आतमध्ये पाश्चात्य पद्धतीचे कमोडही बसवलेले आहेत. मधुचंद्र साजरा करू पाहणाऱ्या नवपरिणीत युगुलांना, मंडळ इथे भाड्याने तंबू बांधून राहू देत असावे. बेटावर एक विहीर आहे. एक बाई पाणी काढतांनाही दिसली. काही स्थानिक रहिवासी व त्यांची गवताने शाकारलेली घरे आहेत. नुकत्याच आलेल्या मच्छीमार होडीतून एक मुलगा धावत आला. त्याने त्या रहिवाशाच्या हातात मोठेसे दिसणारे

काही मासे ठेवले. बेटाचा बराचसा भाग पावसाळ्यात पाण्याखाली जात असावा. उन्हाळ्यात बेट खूपच विस्तारलेले दिसत असावे.

हजाराहून जास्त वर्ग किलोमीटर क्षेत्रफळावर विस्तारलेल्या आणि शेकडो बेटांना स्वतःच्या विस्तारात सामावून घेणाऱ्या चिल्का सरोवराने लाखो स्थलांतरित पक्ष्यांना सालोसाल शीतकालीन आसरा द्यावा आणि साऱ्या परिसराचाच समतोल राखावा या निसर्ग चमत्काराचे आता आम्हीही साक्षीदार झालेलो होतो. अनेक किलोमीटर दूरपर्यंत नावाडी आणि आम्ही प्रवासी यांव्यतिरिक्त सारेच निर्मनुष्य असावे, चहूबाजूंस हिरव्यागार पाण्याव्यतिरिक्त कुठेही किनारा नजरेस येऊ नये, अशा नौकाविहाराचे अविस्मरणीय सौख्यही आता आम्ही गाठीस जोडलेले होते.

### कोणार्क

सूर्यमंदिराची प्रकाशचित्रे आजवर काही कमी प्रकाशित झालेली नाहीत. महाजालावरही अनेक चित्रे सापडू शकतात. आम्हीही भरपूर चित्रे काढली. मात्र तिथल्या नागकन्यांची कमनीयता आणि मानवी मूर्त्यांची प्रमाणबद्धता अवर्णनीय आहे. त्यात वर्णिलेल्या विषयांइतके विषय महाराष्ट्रातल्या लेण्यांतही वर्णिलेले नाहीत. शिल्पकाराला असलेली मूळ वर्ण्य विषयाची जाण, एवढी भव्य शिल्पाकृती करण्यासाठी लागणारा राजाश्रय, त्या त्या राजांची ते ते विषय शिल्पाकृतींसाठी निवडण्यातली दृष्टी, हे सारे आपल्या पूर्वजांच्या मानवी जीवनाविषयीच्या तपशीलवार ज्ञानाविना शक्य होणारे नव्हते. धन्य ते शिल्पकार, धन्य ते प्रजापती आणि धन्य आपले पूर्वज. हे सारे पूर्वापार चालत आलेले ऐश्वर्य पाहण्यासाठी आम्ही इथे आलो हे आमचे सुदैव. वाचकांनीही आयुष्यात एकदा तरी स्वतःच्या डोळ्यांनी पाहावे असेच हे सारे वैभव आहे.



सूर्यमंदिराच्या प्रवेशद्वारापाशीच आम्हाला छत्र्या भाड्याने घ्याव्या लागल्या. कारण पाऊस सुरू झालेला होता. मग आम्हाला भारतीय पुरातत्त्व खात्याने संमत केलेल्या ज्येष्ठ मार्गदर्शकाने गाठले. त्याला फोटोग्राफीचा गजबचा शौक असल्याने कोणार्कला आमचे फोटो कोण काढेल ही आमची चिंता समूळ नष्ट झाली. तो कधी आमचा क्लोज-अप काढे, कधी विशिष्ट जागेचाच हट्ट धरे, कधी पायरीवर चढवून उंचीत साम्य आणू पाहे, तर कधी चाकासोबत फोटो काढण्यास विशिष्ट रचना करवून घेत असे, कधी बगीच्याच्या पार्श्वभूमीवर फोटो काढे, तर कधी विशिष्ट जागी उभे करून फोटो काढे, कधी चाकाच्या या बाजूने फोटो काढे, तर कधी त्या बाजूने फोटो काढे. असे कित्येक फोटो त्याने काढले. त्यात आम्हीही होतो. तसेच इतर प्रेक्षकही होते. मात्र, गोल फिरून आल्यावर, मुख्य द्वारापाशी वर चढण्याची वेळ येताच, कुठलाच मार्गदर्शक वर चढत नाही, असे सांगून त्याने आमचा निरोप घेतला.

मग आम्ही हिरव्यागार बगीच्याचा फोटो काढला. इसवी सनाच्या बाराव्या शतकातही आपल्याला जिराफ माहीत असल्याचा पुरावा कॅमेऱ्यात बंद केला. वेगवेगळ्या वादक आणि नर्तकांच्या शिल्पांचे प्रकाशचित्रण केले. चाकाच्या आसातील चक्रांमधली मदभरालसा चित्रित केली. बाहेरच्या दगडी भेट-वस्तूंच्या दुकानाचा एक फोटो काढला.

### तालपत्रांवरची चित्रकारी

तालपत्रावर अणकुचीदार हत्याराने कोरून चित्ररेखा तयार करायच्या. त्या कोरलेल्यावर मग दालच्या (दाल: कमळाच्या जाळ्यांप्रमाणे पाण्याच्या डबक्यांत अनिर्बंध

वाढणारी अळूसारख्या हिरव्यागार पानांची आणि हळदीच्या फुलाच्या आकाराची, फिकट जांभळी फुले असणारी वनस्पती) पानांचा रस चोपडून काळसर हिरव्या चित्ररेखांची चित्रे बनवणे, म्हणजे तालपत्रांवरची चित्रकारी.



या चित्रात आठ इंची लांब आणि जवळपास एक इंची (नैसर्गिकरित्या ठरणाऱ्या) रूंद पत्र्यांवर सुरेख मंगल-कलश चितारला आहे. आपल्या कालनिर्णयच्या आकाराचे चित्र ह्यातून निर्माण होते. ते साधारणपणे तीनशे रुपयांना विकतात. देवादिकांची किंवा जनजीवनाची चित्रे या शैलीत रेखाटली जातात. कोणार्क शैलीतील कामचित्रेही या शैलीत रेखाटण्याची प्रथा आहे. या प्रकारे पुस्तक-खुणा, भेटपेट्या इत्यादीही बनवल्या जातात, ज्या दहा दहा रुपयांना विकल्या जातात.

देवादिकांची, प्राण्यांची आणि कामजीवनाची कोणार्क शैलीतील चित्रे दशावतारांच्या स्वरूपातही उपलब्ध असतात. अशा चित्रांत वर एक देवाचे चित्र. खाली त्याच्या दहा अवतारांची दहा चित्रे अशी रचना असते. या दशावतारांना, आवाज दिवाळी अंकात असतात तशा द्व्यर्थी खिडक्यांसारख्या त्र्यर्थी खिडक्या काढून दहाही अवतार, दहा निरनिराळे प्राणी अथवा दहा कामचित्रे, खिडक्या उघडून पाहाता येतात. घड्या घालून हे सर्व चित्र एका आठ इंच लांब व सुमारे दोन इंच रूंद पट्टीच्या आकारात गुंडाळून ठेवता येते. चित्राच्या पाठीमागे पोथीला वापरतात तसे कापड लावलेले असल्याने त्याचाच गुंडाळण्यासाठी उपयोग होतो. दोन तालपत्रे एकमेकास बिजागरींनी जोडावीत तद्वत् काळ्या दोऱ्यांनी शिवलेली असतात. ती शिवण वर्षानुवर्षे टिकते असा दावाही केला जातो.

आणखीही एका लोककलेचा उल्लेख इथे करावाच लागेल. तो म्हणजे पट्टाचित्रणाचा. कपड्यावर वनस्पतीजन्य रंगांचा वापर करून, रासक्रीडा, कृष्णचरित्र, दशावतार, कंदर्परथ इत्यादी रेखाटणारी उडिशा शैलीतील चित्रे लक्षवेधक असतात. बारीक बारीक वक्ररेषांच्या मोहक आकृतीबंधांनी ती आणखीनच सुशोभित केलेली असतात. याशिवाय उडिशात बहारीची नृत्यकला विद्यमान आहे. मात्र तिचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याचा योग आम्हाला आला नाही.

**जगन्नाथपुरी**

पुरी हे आपल्या चार धामांपैकी एक ठिकाण. जगन्नाथपुरी बंगालच्या उपसागराच्या किनाऱ्यावरील एक सुंदर शहर. पुरी शहरात, पुरीला 'नीलाचल'ही म्हणतात. जगन्नाथाचे मंदिर गंगवंशाच्या कोडगंग राजाने ११३५ ते ११५० दरम्यान बांधून काढले. मंदिराच्या गाभाऱ्यात जगन्नाथ, बलभद्र आणि सुभद्रा यांच्या मूर्त्या आहेत. आषाढ शुद्ध द्वितीयेपासून आषाढ शुद्ध दशमीपर्यंत (जून-जुलैमध्ये) इथे रथयात्रा असते. मूर्त्यांना रथारूढ करून सुमारे तीन किलोमीटर अंतरावरील गुंडेचा मंदिरात रथ नेऊन स्थानापन्न करतात. सात दिवस त्यांचा मुक्काम गुंडेचा मंदिरातच असतो. मग पुन्हा रथयात्रा गुंडेचा मंदिराकडून मूळ मंदिराकडे येते आणि मूळ मंदिरात मूर्त्या प्रतिष्ठित करून रथयात्रा संपन्न होते. ही रथयात्रा फार पूर्वीपासून सुरू आहे. चौदाव्या शतकातील इटालियन प्रवाशाच्या दैनंदिनीत याचे उल्लेख सापडतात.

जगन्नाथाचे मंदिर हे उडिशातील सर्वात भव्य मंदिर आहे. मंदिरात फोटोग्राफी निषिद्ध आहे. मंदिराला चारी बाजूंनी मजबूत तटबंदी असून पूर्वेला सिंघद्वार, पश्चिमेला व्याघ्रद्वार, दक्षिणेला अश्वद्वार, आणि उत्तरेला गजद्वार आहे. सर्व द्वारांवर गोपुरे आहेत. सिंघद्वाराशी पोहोचण्यास बावीस पायऱ्या चढाव्या लागतात.

पुरीचे मंदिर दुरून नीट दिसत नाही कारण त्याच्याभोवती तटबंदी आहे आणि खरेतर सारे गावच त्याच्याभोवती वसलेले आहे. कोणार्कला सूर्यमंदिर भारतीय पुरातत्त्व खात्याच्या ताब्यात असल्याने तेथे स्वतंत्र व्यवस्था शक्य आहे आणि मंदिरापासून गाव बराच दूर आहे. पुरीचे मंदिर जवळूनही नीट पाहाता येत नाही. याचे कारण मात्र मनोरंजक आहे. मंदिर परिसरात भक्तांचा अविरत राबता असतो. पंडे, पोलीस, श्वेतवस्त्रधारी स्त्रिया यांची सारखीच लगबग चाललेली असते. परिसरातच खिचडी शिजविण्याकरता अगणित चुली सारख्या पेटलेल्या असतात. पूजा-सामान, प्रसादाची दुकाने इत्यादींची रेलचेल सतत फिरती असते. मंदिराच्या शिखरावर बाहेरच्या बाजूने सुंदर शिल्पकला सजवलेली आहे. मात्र मंदिराचे शिखर अतिउंच आहे आणि समकक्ष उंचीवर जाऊन कलेचा जवळून आस्वाद घेण्याची कुठलीही सोय नाही. जमिनीवरून मान उंचावून पाहायला अडथळेच फार. शिवाय कॅमेरा निषिद्ध असल्याने क्लोज-अप घेऊन पाहण्याचीही सोय नाही. त्यात आम्ही गेलो तेव्हा बारीकसा पाऊसही पडत होता. त्यामुळे मंदिर परिसर आणि बडा डंडा यांचे मनसोक्त दर्शन झाले नाही. पुरीच्या पंथनिवासात खाल्लेले दही आणि प्यायलेले सूप मात्र लक्षात राहिलेले आहे. उत्तम चवीमुळे.

**नंदनकानन**

भुबनेश्वरपासून २० किलोमीटर उत्तरेला भुबनेश्वर व कटक या जोड शहरांच्या मध्यभागी, महानदीच्या किनाऱ्यावर नंदन कानन हे विशाल प्राणीसंग्रहालय वसलेले आहे. प्राणीसंग्रहालयातील सर्व प्रदर्शनीय भाग सर्व सुविधांसहित पाहण्यास ४ ते ६ तास लागतात. आम्हाला दोन तासच काय ते उपलब्ध होते. म्हणून आम्ही खेळण्यातील आगगाडी, नौकाविहार, रज्जूमार्गाने उंचावर जाऊन भुबनेश्वर दर्शन इत्यादींवर पाणी सोडले. व्हाईट टायगर सफारी आणि लायन सफारीचा अनुभव मात्र घेता आला. नैसर्गिक रहिवासातील सिंहाचे जोडपे पाहाता आले.



प्राणी संग्रहालयात सिंह, वाघ, पांढरा वाघ, तरस, मगर, सुसर, पाणघोडा, गेंडा, अजगर, हरणे, नील गायी इत्यादिकांचे व्यवस्थित दर्शन झाले. इथे अधिकृत मार्गदर्शक सोबत नेता येतो. अर्थातच मोल देऊन. प्राणीसंग्रहालय विस्तृत आणि प्रेक्षणीय आहे.

**- नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

●●●

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**

# नर्मदा परिक्रमा

**भाग : २८**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**बुधवार दि. ६ फेब्रुवारी २०१३. दिवस ७३ वा. (पनै) सिद्धघाट-रामपुरा-दिछावर-हिरापूर मु. राजराजेश्वरी मंदिर**

सकाळी ७ वाजता जाग आली. कारण रात्री १२ वाजून गेले. तरी माझ्या व बन्सीच्या गप्पा सुरू होत्या. तत्पूर्वी काल केशवदासजी महाराजांना भेटलो. त्यांना भेटायला श्रीवास्तव दांपत्य आले होते. त्यांच्याशी रात्री गप्पा झाल्या. थोडा वेळ बासरी वाजविली होती.

अशोक आणि मी यांचा मुक्काम काल वेगवेगळ्या गावात आणि आजही फरक तसाच. त्यामुळे मी व बन्सी हिरापूर येथे तर अशोक पुढल्या ५ कि.मी. वरील करौंदा गावात आहे.

सकाळपासूनच अशक्तपणा जाणवत होता. काल अवस्था तशीच होती. माझा एकंदर उत्साह मावळत चालला आहे. घरी परतावे असे वाटायला लागले आहे ते थकव्यामुळे!

मैय्या किनारा गाठला, वाळू इतकी की, चालणे कठीण व्हावे. त्यातून थकवा, चालायची इच्छा होत नव्हती. सकाळी निघायला ८ वाजले होते. अकराच्या सुमारास किनारा सोडून वर गावात चढलो. तिथून रामपुरा गावात शिरलो. धनराजपुरी गोस्वामी यांनी चहा दिला. भोजन प्रसाद विचारला. थांबून जेवलो, तासभर गेला. १ वाजता पुढे निघालो.

धनराजपुरी यांनी २ परिक्रमा केल्या आहेत. अंगणात शिवलिंग स्थापित केले आहे. मुलाला मूलबाळ नव्हते. धनराजभाऊंनी नातवंड हवे म्हणून परिक्रमा सुरू केली. कठपोरला कुणी बाबाजीने विचारले, ‘मुलगा हवा की मुलगी?’ ‘काहीही!’

दिलेली विभूती परिक्रमेनंतर सूनबाईला दिली. नात ‘नर्मदे’चा जन्मा झाला. फारच लाघवी आणि सुंदर. दोन-अडीच वर्षाची आहे ती नर्मदा. शिवलिंगासमोर सारवलेल्या अंगणात धनराजसह आमची दोघांची पाने तर नर्मदाही नैवेद्याचे ताट घेऊन जेवायला तिथेच! तत्पूर्वी शिवमहिमा म्हटले, इच्छा होतीच. पण चहासाठी बूट कोण काढणार? भोजन म्हटल्यावर काढावे लागले.

आता गावातून पुढे निघालो. पायवाटा शेतांमधून जातात. अगदी मैय्याकिनारीसुद्धा उताराची जमीन. ही हरभरा, गहू, तूर, इ. पिकांनी व्यापलेली असते. पायवाट शेत सोडून अगदी काठाजवळ; की घसरला तर मैय्यातच पडेल! बऱ्याच वेळा काटे लावून अगदी अरुंद भाग सोडलेला असतो की सॅकला एका डाव्या बाजूने काटे ओरबाडत राहातील.

नदीच्या वाळवंटात देवी देवतांचे गवती अवशेष टाकून दिलेले असतात. नवरात्री/गणेश चतुर्थी या निमित्त गवताचा उपयोग करून सहा ते वीस फुटांच्या मूर्ती तयार केल्या जातात व नंतर त्या विसर्जित केल्या जातात. चुना विरघळतो आणि उरलेले गवती हातपाय इत्यादी अवशेष वाळवंटात सापडतात.

गावातल्या रस्त्याने निघालो आणि एका कोरड्या नदीत दाखल झालो. पात्रात जाड वाळू, रुंद पाय, चालायला त्रास होऊ लागला. वळणे घेत घेत आम्ही

कोरड्या नदीच्या पोटातून कुठे चाललो होतो तेच कळेना. कारण आम्ही पूर्व दिशेला जात नव्हतो. अखेर गव्हाची शेते पायात लागली आणि रस्ता बंद झाला. बाजूची उंच भिंत (कडा) चढून जायच्या प्रयत्नात माझे पाऊल घसरले व मी सरळ खाली गव्हाच्या ओल्या रोपांमध्ये जाऊन पडलो. उजव्या अंगावर पडल्याने उजवा हात उचलता येईना. मी, सॅक असे एक बंडलच तयार झाले होते. डाव्या हाताने पोटाचा पट्टा सोडविता येईना. सॅक काढता येईना म्हणून उठताही येईना. बन्सी पुढे होता. माझ्या हाका ऐकून धावतच मागे आला व माझी सॅक सोडवून मला उभे केले व त्याचे + माझे ओझे दोन्ही गाठोडी खांद्यावर मारून पुढे सुरक्षित जागी नेऊन ठेवली. माझी हाक ऐकल्याबरोबर तो मागे वळला, मला पडलेले पाहिले व कमंडलू फेकून काठीही तशीच सोडून माझ्या मदतीला धावला. पाठीवरचे गाठोडे मात्र तसेच होते.

२। टिमरावन गावात पोहोचलो. चहा घेतला, कळले की अशोक पुढील हिरापूर गावात आहे. भोजन करून पुढे निघाला आहे.

आम्ही गाव सोडले. अर्ध्या पाऊण तासात, संगमाच्या बरेच अलीकडे, एक नदी, पाऊल दीड-पाऊल पाण्यातून पार केली. पुढे दोन-तीन कि.मी. वरील हिरापूर गाव गाठले.



**हिरापूरचे बाबा**

राजराजेश्वरी मंदिर म्हणजे खरोखर विद्येचे पवित्र मंदिर आहे. इथे संस्कृत पाठशाला आहे. छात्रावास आहे.

**गुरुवार दि. ७ फेब्रुवारी २०१३. दिवस ७४ वा. हिरापूर-करौंदी-बेलथारी-झिरी मु. फिरार क्षत्रिय-झिरी घाट-धर्मशाळा.**

काल शेतात पडलो. आजही घसरलो, पण नर्मदेच्या पाण्यात पडण्यापासून वाचलो. गव्हाच्या शेतातून पायवाटेवर इतके पाणी झिरपले होते की बूट एक इंच रुतले. ते वाचविण्यासाठी थोडा पाऊलभर खाली उतरलो तर पाय घसरला आणि हातात काहीतरी (गवतइ.) सापडले आणि तोपर्यंत बन्सीने लाठीचा आधार दिला व मी हळूच वरती आलो पसरलो. फूट दीड फूट आणि मैय्याचे पाणी आणखी दोन एक फूट खाली! पडलो असतो तर कॅमेरा वगैरे अगदीच वाया गेला असता शिवाय वरती येणे फारच कठीण झाले असते. वाचलो नर्मदे हर!

अकरा वाजेपर्यंत अगदी किनाऱ्यावरून चाललो. लांबीला वीस-तीस फुटाचा असा एक उभा उतार होता की डोंगरावरून कडे उतार पार करायची सवय नसेल तर पाऊलच टाकायची हिंमत होणार नाही; त्यातून फसवी माती, रेतीमय! कधी बूट घसरेल सांगता येत नाही आणि खाली दहा पंधरा फूटांवर मैय्याचा गतिमान प्रवाह. सगळी वाट अशी बिकट नसते. मधे कधीतरी बन्सी पुढे निघून गेला. मला चालताना फार अशक्तपणा जाणवत होता. मी कशासाठी चालतोय आणि कुठे जायचे आदी आणि हे सारे अंतहीन मी का करतोय असे विचार/प्रश्न मनात यायला लागले. गेले दोन-तीन दिवस अशोकची भेट नाही. कारण मी मागे मागे पडत चाललो आहे. बन्सीबरोबर होता तो पुढे गेला. नंतर दिसलाच नाही.

सकाळी ककडी घाटावर रामकुमार कौरव नावाच्या श्रद्धावान शेतकऱ्याने आम्हाला पाहाताच हाळी दिली व धावत धावत किनाऱ्यापासून वाळवंट ओलांडून आम्हाला

थांबविले. त्या अगोदर एका टेकडीवरून हाक आली म्हणून आम्ही हरभरा शेतातून पायवाटेने वर चढून चहाचा आस्वाद घेतला होता. हे कुटुंबही शेतावरील खोपटात राहणारे. पण फार प्रेमाने स्वागत झाले होते.

चहा झाल्याचे रामकुमारना कळल्यावर त्यांनी बालभोग म्हणून गोड बुंदी दिली. यांनी तीनवेळा परिक्रमा केली आहे आणि पलीकडल्या तीरावर १५/१६ कि.मी. अंतरावर घरदार आहे आणि ककडी घाट वाळवंटात मैय्याकिनारी एक तंबू/मंडप लावून ते इथेच असतात. चहापाणी, बोलभोग आणि जेवणाचाही इतका आग्रह की, माणसाला पुढे जाऊच देत नाहीत. सकाळचे ८.३०/ ९.०० च झाले होते. मोठ्या प्रयत्नांनी बालभोगावर सुटका झाली. रामकुमार इतके नम्र की साष्टांग नमस्कार घालून स्वागत करतात.

११ वाजेपर्यंत किनाऱ्यावरून एकाकी चालताना मन अगदी नकरात्मक विचारांत बुडून गेले होते. गावागावांतून जाणारा रस्ता असला की भेटीगाठी होत राहातात. एकाकीपणा कमी जाणवतो. मात्र किनाऱ्यावरून इतके एकाकी वाटले की मन खचूनच गेले. माझे शरीर थकले की मन थकले काही कळत नाही आहे.

एक विचार येतो ५०% परिक्रमा झाली आहे; होईल तशी पण पैदल पुरी करावी. परिक्रमा सोडून जाणे केव्हांही शक्य आहे. परंतु आयुष्यात ही संधी पुन्हा येणार नाही. मैय्या परीक्षा घेतेय. नापास होणे किती सोपे आहे; परत यायचे?

११ वाजता कठार वाजता शिरलो. हळूहळू चढण चढून वर आल्यावर दोन-एक मिनिटे काठीला हनुवटी टेकून नुसताच उभा राहिलो. खरे म्हणजे बन्सी निघून गेल्यावर, परंतु या गावात शिरण्यापूर्वी, किनाऱ्यावर मोकळी जागा बघून मी सॅक उतरविली, आसने काढली, थाळी काढली, खायचे पदार्थ काढले. कुणीच बरोबर नव्हते. एकट्याने खायची ही पहिलीच वेळ होती. बिस्किटांबरोबर कच्चे शेंगदाणे सावकाश खाल्ले. आता कुणासाठी थांबायचे नव्हते की कुणाला गाठण्यासाठी धावायचे नव्हते.

एक निरंजन झालो होतो. इतकी माणसे एकट्याने चालतात आपणही आता एकटेच उरलो आहोत.

हे गाव मागे टाकून पुढे २ कि.मी. चालून गांव गाठायचे म्हणून शेवटच्या घरासमोर एकाला विचारले. परंतु त्या आधी त्याच्याच अंगणात विश्रांतीसाठी बसलो. साडे-अकरा वाजून गेले. जेवायचे कुठे?

आकाश अंधारून आले आणि पावसाची स्पष्ट लक्षणे दिसायला लागली. थंडी वाजायला लागली. अशक्तपणाची पुन्हा एकवार जाणीव झाली आणि मी अनुज्ञा घेऊन ओट्यावरील खाटेवर आडवा झालो.

थंडी वारा. कांबळे त्याच्याकडे नव्हते. स्लीपिंग बॅग उघडली व त्यात शिरून झोपलो. पुन्हा उठून ओले कपडे वाळत घातले व पुन्हा झोपलो. आजचा दिवस याच ठिकाणी काढावा लागेलसे वाटले. पावसाची लक्षणे दाट झाली होती. साधारण तासभर झोपलो. आकाशही मोकळे झाले. थकवाही कमी झाला, उठलो आणि कृतज्ञता व्यक्त करून पुढे निघालो. तो पर्यंत माहिती मिळाली होती की पुढल्या बेलधारी गावातून काही न काही वाहन/बसने दोधी गाव गाठले की ब्राह्मणघाटसाठी बस मिळते. परंतु हे दोधी गाव परिक्रमा मार्गावर नाही. बेलधारी गावातच निश्चित निर्णय घेणे आवश्यक होते.

बेलधारी गावच्या पाउलवाटेवर थोडा वेळ चालल्यावर मागून येणाऱ्या लुहिन मित्रा या परिक्रमावासीस गाठले व आम्ही अनायासे एकत्र पुढे निघालो. ५४ वर्षीय मित्रा सहा महिने हिमालयात तर सहा महिने भारत वर्षात पैदल असतात.

हिमालयात तंबू लावून ते वस्तीपासून दूर एकटेच वास्तव्य करतात. चहा भोजन अवचित आले तरच घेतात.

बेलधारी गाव आले आणि मला पुढे न जाता दुसऱ्या मार्गाने दोधी गावाकडे जायचे होते आणि मित्राबरोबर असल्यामुळे मला काही करता येईना!

गावातून वस्तीतून पुढे गेले आणि कुणी हाक दिली म्हणून चहासाठी मागे वळलो. खरे म्हणजे आमच्यासाठी होती भोजनाची वेळ पण सांगणार कसे! चहासाठी बसल्यावर मी थकव्यामुळे याच गावात राहाण्याचा विचार प्रकट केला. सचिनला फोन करून परतण्याची कल्पना दिली.

मित्र म्हणाले मैय्या परीक्षा घेते. जमेल तसे, जमेल तेव्हा चाला, वाटेल तेव्हा थांबा आणि विश्रांती घ्या. पण परिक्रमा सोडू नका. जो मनाने मेला तो खरोखर मरतो. हवे तर या गावात आज राहा.

मी तिथेच बसून राहिलो आणि मित्रा निरोप घेऊन पुढे निघाले. चहा दिला त्या झलकनसिंग यांनी मला भोजनाबद्दल विचारले आणि मी भोजन केले नसून; आता गेले ते मित्रासुद्धा भोजनाचा आग्रह झाला तरच भोजन घेतात असे सांगितल्यावर पुढे गेलेल्या मित्रांनाही भोजनासाठी परत बोलविले गेले.

भोजन होईपर्यंत माझी मनोवृत्तीही सकारात्मक झाली. काय करायचे? असे विचारल्यावर 'पुढे जायचे' म्हणून आम्ही गप्पागोष्टी झाल्यावर ४ वाजता पुढे निघालो. त्या आधी मी अशोक आणि सचिनला फोन करून कळविले की, परत जात नसून जमेल तसे पायीच मागून येत राहाणार आहे. आज झिरी घाट गाठला. तेव्हा १४ कि.मी. वाटचाल झालेली होती.

**- अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

●●●

## निर्दयी जग

दाट वनराई
पसारा शाखांचा,
संसार जमला
तेथे नाचणांचा ॥

रूप चिमणीचे
मोराचा पिसारा,
थारा नाही जरा
नाचण नाचरा ॥

इवलेसे घर
चोचीने विणले,
आधारावीणही
झाडाला टांगले ॥

सृजन सृष्टीची
करामत झाली,
छोट्या घरी छोटी
बाळे जन्मा आली ॥

बाळांची काळजी
नाही त्यांना थारा,
सतत हिंडुनी
आणती ते चारा ॥

सुखाचा संसार
सुरू होता परि
नजर लागली
काक दुष्ट भारी ॥

इवल्याने त्याला
कितीदा हाकिले,
तरी घरकुल
निर्दये मोडिले ॥

दुखावले किती
मातृपितृ-मन!
बाळांना निवारा
देई आता कोण?॥

नाचणाची कथा
शिकवुनी गेली,
स्वार्थी ह्या जगाने
दया बुडविली ॥

**- दीपक धोंडे (शिक्षक)**
डॉ. बेडेकर विद्या मंदिर,
नौपाडा, ठाणे

●●●

आज आपण जिथवर पोहोचलो त्याचा अभिमान जरूर बाळगा. जिथवर पोहोचायचे ठरवले आहे तिथवर नक्की पोहोचणार आहोत त्याचा विश्वासही जरूर बाळगला पाहिजे.

# ओळख वनस्पतींची
# कांडोळ / भुताचं झाड

*'ओळख वनस्पतींची' या लेखमालेतील सातवा भाग. 'कांडोळ / भुताचं झाड' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

एप्रिल महिन्यातील एक संध्याकाळ. आमच्याकडे आलेल्या पाहुण्यांना परिसरातील झाडे दाखवित होतो. सोवतच्या एक काकू एकाएकी थांबल्या, 'अय्या ऽऽ काय गोड फूल आहे ऽऽए' म्हणताना जरा वाकल्या. मी जवळ जवळ ओरडलोच 'काकू ऽऽ त्याला हात लावू नका;' पण माझा आवाज त्यांच्यापर्यंत पोहचण्यापूर्वीच त्यांचा हात त्या सुंदर फुलापर्यंत पोहोचला होता. अन् दुसऱ्याच क्षणी, 'आई गऽऽऽऽ' म्हणत हात मागे आला. कुतूहलाची जागा वेदनेने घेतली. काकूंच्या बोटांवर व अंगठ्यावर केसांपेक्षाही बारीक अशा अनेक काट्यांनी गर्दी केली होती. काकू अगदी रडकुंडीला आल्या. त्यांना शांत केले. बाजूलाच पडलेल्या एका काटकीपासून प्लकर बनवून त्यांच्या बोटांवरील सर्व कुसळं काढली. काकूंचा चेहरा गोरामोरा झाला होता व झाडे बघण्याचा उत्साह देखील आता मावळला होता.

काकूंनी उचललेले फूल हे फुल नसून एक फळ होते. निसर्गाने झाडांच्या संरक्षणाच्या दृष्टीने केलेली उपाय योजना म्हणून हे सूक्ष्म काटे त्या फळाला बहाल करण्यात आले होते. ते फळ होते कांडोळ या वृक्षाचं. कांडोळाचं झाड आपला सुंदर देहभार प्रदर्शित करीत बाजूलाच उभे होते. कांडोळ हा हिमालयाच्या पायथ्यापासून दक्षिणेकडे अगदी श्रीलंकेपर्यंत आढळणारा एक वैशिष्ट्यपूर्ण वृक्ष आहे. प्रत्येक भाषेत वेगळ्या नावाने ओळखला जाणारा हा वृक्ष मराठीत कशया, करई करू आणि कांडोळ आदी नावांनी ओळखला जातो. Sterculiaceae कुटुंबातील सर्वच जाती ह्या त्यांच्या दुर्गंधामुळे ओळखल्या जातात. स्टर्क्यू म्हणजे विष्टा. कांडोळ याच कुळातील असल्याने दुर्गंधाचे देणे (की शाप) त्यालाही लागले आहे. वास्तविक निसर्गाला फक्त गंध तेवढा महत्त्वाचा. परागकिरणांसाठी किटकांना आपल्याकडे आकर्षून घेणे हे गंधाचे काम. सुगंध किंवा दुर्गंध या मानवी संकल्पना आहेत.

Sterculia Urens हे कांडोळाचे शास्त्रीय नाव. मध्यम उंचीच्या या दिमाखदार झाडाची उंची साधारणपणे १५ मीटरपर्यंत वाढते. फांद्यांचा विस्तार बाजूला पसरणारा असल्याने आकार घुमटासारखा दिसतो. पण फांद्यांची संख्या कमी असल्याने गर्दी नाही. या झाडाचे खोड वैशिष्ट्यपूर्ण असते. पांढुरक्या रंगामुळे व फांद्यांची गर्दी नसल्याने रात्री या झाडाकडे पाहिल्यास अनेक हात असलेली एक प्रचंड आकाराची मानवी आकृती उभी असल्याचा भास होतो. यामुळेच याला Ghost tree किंवा भुताचे झाड म्हणूनही ओळखले जाते. याची साल गुळगुळीत असून ३ ते ४ इंचाचे वेगवेगळ्या आकाराचे पॅचेस असलेली असते व एकाच रंगाच्या वेगवेगळ्या छटा असलेले सुंदर चित्र आपण बघतो आहोत असे वाटते. मी ज्या ज्या वेळी या झाडाकडे पाहातो तेव्हा प्रत्येक वेळी त्यात नवीन आकृत्या दिसतात. जर तुम्ही या वृक्षाच्या बुंध्यावर १x१ फुटाचे चौकोन जवळजवळ आखले तर प्रत्येक चौकोनात एक सुंदर कलाकृती चितारल्याचा अनुभव तुम्हास मिळेल. एका रंगाच्या विविध छटांमध्ये साकारलेली ही अमूर्त चित्रे निसर्गाने मुक्तहस्ताने प्रदर्शित केलेली आढळतील.

भूतकाळ सतत डोक्यात ठेवला तर आपण आपला वर्तमानकाळ बिघडवत असतो म्हणून जुन्या, झालेल्या चुका विसरून पुन्हा नव्याने कामाला लागल पाहिजे .

हाताच्या पंजासारखी असणारी सहा ते दहा इंच आकाराची पोपटी रंगाची पाने फांद्यांच्या टोकाशी गर्दी करतात. या पानांवर मऊ लव असते. आकार द्राक्षांच्या पानांसारखा असतो. ती साधारण जून ते ऑक्टोबर याच कालावधीत दिसतात. नंतर पानगळ होऊन झाड एखाद्या सांगाड्यासारखे उभे असते. त्याही स्थितीत आपल्या अनोख्या रंगसंगतीमुळे ते सुंदरच दिसते. या निष्पर्ण फांद्यांच्या टोकांवर जानेवारी महिन्यात फुले येण्यास सुरुवात होते. घंटीच्या आकाराची ही फुले लांबून मात्र दिसत नाहीत. फाद्यांच्या टोकावर असलेल्या केसाळ गुच्छामध्ये ती दिसेनाशी होतात. फुले गळली तरी त्या केसाळ अन् एखाद्या पक्ष्यांच्या घरट्यासारख्या दिसणाऱ्या चिकट व बेंगरूळ गुच्छातच चिपकून बसतात. फूल म्हटले की ते सुगंधीत असणारच अशी आपली धारणा असते. पण स्टक्यूलियाशी कुळातील झाडांची फुले याला अपवाद आहेत. ही सर्व फुले दुर्गंध पसरवून जवळून जाणाऱ्यांना नाक मुठीत धरायला लावतात.

एप्रिल, मे मध्ये झाड सुंदर लाल पोपटी फळांनी भरून जाते. ही फळं पाच पाकळ्यांची अन् फुलांसारखी दिसणारी व आकार दोन इंचापर्यंत. या फळांवर बारीक लव असते. ही लव म्हणजे अक्षरशः बारीक काटेच असतात. चुकून कुणी ते फळ हातात घेतलेच तर हे काटे त्याला सळो की पळो करून सोडतात. आमच्या काकूंनी फूल समजून ते फळ उचलले आणि झाल्या वेदनेच्या धनी. या फळांच्या बिया आदिवासी मोठ्या आवडीने खातात. आपण हे धाडस न केलेलेच बरे.

या झाडापासून उत्तम प्रतीचा डिंक मिळतो. झाडाच्या सालीवर आडवे छेद दिल्यास त्यामधून हा डिंक बाहेर पडतो. हा डिंक करा या गम या नावाने प्रसिद्ध आहे. विविध औषधे, मिठाया, आइसक्रिम यामध्ये याचा वापर होतो. औषधी गोळ्यांना विशिष्ट आकार देण्यासाठी बाईंडर म्हणून यांचा उपयोग होतो. मात्र या डिंकाचा अतिवापर जुलाबास कारणीभूत ठरतो. त्यामुळे तो प्रत्यक्ष न खाल्लेलाच बरा. या डिंकाचे तसेच सालीच्या रसाचे अनेक औषधी उपयोग आहेत. मात्र वापर तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखालीच व्हायला पाहिजे.

या झाडाच्या लाकडापासून विविध खेळणी, वाद्यं बनविली जातात. तसेच खोडापासून लहान नावा तयार करतात. त्याला होडकी किंवा डोंजी म्हणतात. लाकूड मऊ असल्याने ते सहज कोरता येते. या झाडांच्या फाद्यांपासून तंतू काढून त्यापासून उत्तम दोरखंड तयार करतात. हल्ली मात्र पर्यायी तंतू उपलब्ध होत असल्याने हा उद्योग कमी झाला आहे.

हा वृक्ष पानगळीच्या जंगलात जास्त आढळत असला तरी कोकणासारख्या सदाहरीत प्रदेशातही आढळतो. मुंबईत राणीच्या बागेत तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात हा वृक्ष आढळतो. आरे कॉलनी तसेच मलबार हिलवरील उद्यानाच्या परिसरात काही झाडे आहेत. मुंबई गोवा मार्गावर कर्नाळा अभयारण्य ओलांडून पुढे गेलो की गोग्रीन नर्सरीच्यापुढे कांडोळाची बरीच झाडे आहेत. निसर्गाने मुक्तपणे उधळलेला हा सौंदर्याचा खजिना आपल्या परिसरात ठायीठायी विखुरला आहे. पण घड्याळाच्या काट्यावर लक्ष ठेवून दैनंदिन कामासाठी पळत असलेल्या शहरी माणसाला याकडे बघायला वेळच नसतो. थोडा वेळ काढला तर एक मोठ्ठं घबाड आपल्या हाती लागू शकेल हे नक्की.

**- प्रकाश दुधाळकर**
एफ-२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर-नवघर लिंक रोड,
मुलंड (पू.), मुंबई - ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२

•••

# मराठी मुलुखातील मर्दानी योद्धा : श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे

*१८ व्या शतकातील खंबीर पेशवे थोरले बाजीराव यांची माहिती देणारा लेख - संपादक*

भारताला अडीच हजार वर्षांच्या इतिहासाचा वारसा आहे. भारतामध्ये प्राचीन काळात सिंधू संस्कृती व वैदिक संस्कृती होऊन गेल्या. सिंधू संस्कृतीच्या काळात भारतीय समाज हा प्रामुख्याने नागरी होता असे इतिहासकारांचे व पुरातत्त्व शास्त्राच्या तज्ज्ञांचे मत आहे. ह्या मताला त्याकाळातील मोहेंजोदडो व इतर शहरांचे अवशेष पाहिल्यावर दुजोरा मिळतो. ह्या शहरांची नगर रचना अप्रतिम होती. रस्ते काटकोनात होते व सांडपाणी वाहून नेण्याची देखील विशेष व्यवस्था होती. वैदिक संस्कृती म्हणजे तर आपल्या भारतीयत्वाचा आत्मा होय. वैदिक काळ ते आजतागायत आपल्या अनेक चालीरिती व परंपरा अखंडपणे चालत आल्या आहेत. अडीच हजार वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीत भारतातील विविध भागांत अनेक राजघराण्यांनी राज्य केले. या राजघराण्यांत अतिशय महान राजेदेखील होऊन गेले. अशा काही प्रसिद्ध भारतीय राजांची नावे पुढील प्रमाणे आहेत - बिंबीसार, अजातशत्रू चंद्रगुप्त मौर्य, बिंदूसार, अशोक, गौतमीपुत्र सातकर्णी, समुद्रगुप्त, हर्षवर्धन, पुलेकशीन दुसरा, रामदेवराय, कृष्णदेवराय, छत्रपती शिवाजी इत्यादी.

महाराष्ट्राचा विचार केला असता, महाराष्ट्राचा इतिहास सातवाहन काळापासून उपलब्ध आहे असे इतिहासकारांचे मत आहे. इसवी सनपूर्व तिसऱ्या शतकात सातवाहन ह्या राजघराण्याचे राज्य सध्याचा महाराष्ट्र व दक्षिणेतील कर्नाटक तसेच इतर प्रदेशांवर होते. सातवाहन सम्राटांनी आपल्या साम्राज्याचा विस्तार मोठ्या प्रमाणात केला. ह्या राजघराण्याच्या सर्वात प्रसिद्ध राजाचे वा सम्राटाचे नाव गौतमीपुत्र सातकर्णी होय. ह्या राजाविषयीची माहिती नाशिक येथील शिलालेखावरून देखील मिळते. ह्या सम्राटाच्या आईचे नाव गौतमी बालश्री असे होते. असे त्याच्या नावावरून जाणवते. गौतमीचा पुत्र तो 'गौतमीपुत्र' ह्यावरून अभ्यासकांनी हे मत मांडलेले दिसते. यावरून असे देखील सिद्ध होते की, सातवाहनांच्या काळात महाराष्ट्रातील स्त्रियांना उच्च दर्जा होता. सातवाहनांप्रमाणेच नंतरच्या काळात राष्ट्रकूट, चालुक्य, शिलाहार, यादव इत्यादी राजघराण्यांनी महाराष्ट्राच्या विविध भागांवर राज्य केले. ह्या राजांनी महाराष्ट्राच्या संस्कृतीला, समाजाला व धार्मिक प्रगतीला वेगळा आयाम दिला व महाराष्ट्र संस्कृती प्रगल्भ होण्यास मदत केली असे म्हणणे वावगे ठरणार नाही. वर नमूद केलेले राजे व राजघराणी जरी महाराष्ट्रात होऊन गेली तरी त्यांचा प्रभाव व नाव संपूर्ण भारतभर होते व त्यांचे भारताच्या इतिहासात अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. महाराष्ट्राने प्राचीन काळापासून असे अनेक राजे देशाला दिलेले आहेत.

इसवी सनाच्या १७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात स्वराज्याची स्थापना केली. ही घटना देशाच्या इतिहासाला वेगळे वळण देणारी ठरली. मध्ययुगीन काळात इ.स. सन १००० पासून खऱ्या अर्थाने भारतावर मुस्लीम आक्रमणांची सुरुवात झाली. इसवी सन १००० ते १०१७ ह्या कालावधीत गझनीच्या महमुदाने भारतावर सतरा वेळा (काही इतिहासकारांच्या मते बारा वेळा) हल्ला केला व लूट केली. एवढेच नव्हे, तर गुजरातमधील जगप्रसिद्ध अशा सोमनाथ मंदिरावर देखील हल्ला केला. तेथील शिवलिंगाची नासधूस केली व मंदिरातील द्रव्याची लूट केली. गझनीच्या महमुदानंतर १२ व्या शतकात अफगाणीस्तानातूनच आलेल्या मोहम्मद घोरीने भारतावर व प्रामुख्याने उत्तर भारतावर आक्रमणे

चालून पाय थकायला नको म्हणून डोकं चालवतो तो खरा माणूस!

करण्यास सुरुवात केली. त्याने ११९१ व ११९२ ह्या दोन वर्षांत उत्तर भारतातील पराक्रमी राजा पृथ्वीराज चौहान याच्याबरोबर दोन लढाया केल्या. पहिली लढाई अर्थात ११९१ मध्ये झाली. ही लढाई भारतीय इतिहासात तरेनची पहिली लढाई म्हणून प्रसिद्ध आहे. ह्या लढाईत पृथ्वीराज चौहानाने मोहम्मद घोरीचा पराभव केला. मात्र, घोरी पुढच्याच वर्षी म्हणजे ११९२ साली पुन्हा भारतावर चाल करून आला व पृथ्वीराज चौहान व त्याच्यात दुसरी तरेनची लढाई झाली. ह्या दुसऱ्या तरेनच्या लढाईत मोहम्मद घोरीने पृथ्वीराज चौहानचा पाडाव केला. ह्या लढाईनंतर मोहम्मद घोरीने दिल्लीसह इतर अनेक प्रांत काबीज केले व खऱ्या अर्थाने उत्तरेतील हरियाणा, पंजाब आदी प्रांत मोहम्मद घोरीच्या साम्राज्याचा घटक वा हिस्सा बनले. मोहम्मद घोरीने आपल्या भारतातील प्रदेशांची देखरेख करण्यासाठी कुतुबुद्दीन ऐबक ह्या सुभेदाराची नेमणूक केली व तो अफगाणिस्तानात परत गेला.

इसवी सन १२०६ मध्ये मोहम्मद घोरीचा मृत्यू झाला व त्यानंतर त्याच्या साम्राज्याचे विघटन झाले. त्याच्या साम्राज्यातील विविध प्रांताच्या सुभेदारांनी घोरीच्या मृत्यूनंतर आपले स्वातंत्र्य घोषीत केले व स्वतःचे राज्य निर्माण केले. अशाच प्रकारे कुतुबुद्दीन ऐबकने मोहम्मद घोरीच्या भारतातील प्रांतांचा स्वतःस राजा म्हणून घोषीत केले व दिल्लीच्या सुलतानशाहीची स्थापना केली. कुतुबुद्दीन ऐबक हा पूर्वाश्रमीचा मोहम्मद घोरीचा गुलाम होता. कुतुबुद्दीन ऐबक नंतर त्याचा जावई अल्तमश हा दिल्लीचा सुलतान झाला. अल्तमश कुतुबुद्दीन ऐबकचा गुलाम होता. ऐबकने अल्तमश मधील नेतृत्व गुण पाहून त्याला सैन्यामध्ये उच्चपद दिले व तो नंतर ऐबकचा जावई देखील झाला. ह्या राजघराण्यातील बहुतेक राजे पूर्वाश्रमीचे गुलाम असल्यामुळे त्यांच्या राजवंशास गुलाम राजवंश असे देखील म्हणतात. ह्या वंशात रझिया व बल्बनसारखे सुलतान देखील होऊन गेले. गुलाम वंशानंतर खिलजी, तुघलक, सैय्यद, लोदी ह्या राजवंशांच्या सुलतानांनी दिल्लीच्या सुलतानशाहीवर राज्य केले. यापैकी खिलजी राजघराण्यातील अलाउद्दीन खिलजी हा उत्तरेकडून नर्मदा व तापी नदी पार करून दख्खनेत येणारा मध्ययुगीन काळातील पहिला मुस्लीम आक्रमण कर्ता होय. तो १३ व्या शतकाच्या सुरुवातीस देवगिरीवर चाल करून आला होता. त्यावेळी महाराष्ट्रावर यादव वंशातील रामदेवराय ह्या राजाचे राज्य होते व सध्याच्या मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्यातील देवगिरी हे त्यांच्या राजधानीचे ठिकाण होते.

कालांतराने दिल्लीच्या विविध सुलतानांनी हळूहळू भारताच्या विविध भागांत आपले साम्राज्य पसरविण्याचे काम केले. दिल्लीच्या सुलतानशाहीवर मूळचा मध्य आशियातील असलेला व नंतर अफगाणीस्तानावर (प्रामुख्याने काबुलवर) वर्चस्व प्रस्थापित करणाऱ्या बाबर या आक्रमणकर्त्याने निर्णायक हल्ला केला. इसवी सन १५२६ मध्ये बाबर व दिल्लीच्या सुलतानशाहीतील शेवटचा सुलतान इब्राहिम लोदी यांच्यात निर्णायक लढाई झाली. ही लढाई भारताच्या इतिहासात पानिपतची पहिली लढाई म्हणून प्रसिद्ध आहे. बाबरने ह्या लढाईत इब्राहिम लोदीचा धुव्वा उडवला. ह्या लढाईनंतर दिल्लीच्या सुलतानशाहीचा अस्त झाला व उत्तरेत मुघल राजघराण्याच्या सत्तेचा पाया रोवला गेला. १५२६ पासून ते १८५७ पर्यंत ह्या राजघराण्याने भारतातील विविध भागांवर राज्य केले. बाबर नंतर ह्या राजघराण्यात हुमायूँन, अकबर, जहांगिर, शहाजहान, औरंगजेब हे प्रसिद्ध सम्राट होऊन गेले. अकबराच्या काळात मुघल सत्ता ही खऱ्या अर्थाने सर्वात प्रबळ साम्राज्यवादी सत्ता म्हणून पुढे आली.

१७ व्या शतकापर्यंत दख्खन व दक्षिणेत मुस्लीम राजवटी अस्तित्वात आल्या. उदाहरणच द्यायचे झाले तर अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही ह्या त्या मुस्लीम सत्ता होत. शिवाजी महाराजांनी ह्याच मुस्लीम सत्तांविरुद्ध लढा देऊन दख्खनेत मराठा स्वराज्याची स्थापना केली होती. शिवाजी

माणूस घरे बदलतो, माणूस मित्र बदलतो, माणूस कपडे बदलतो, तरी तो दुःखी असतो.
कारण तो आपला स्वभाव बदलत नाही.

महाराजांनी दख्खनमधील मुस्लीम सत्ता व उत्तरेतील मुघलांना जेरीस आणले होते. शिवाजी महाराजांनी १६७४ साली स्वतःचा राज्यभिषेक करून आपले राजा म्हणून स्थान भक्कम केले. शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या प्रशासनाची घडी पक्की बसविण्याचे मोठे कार्य केले. त्याचप्रमाणे त्यांनी राज्यव्यवहार कोश देखील बनविला. महाराजांनी स्वराज्याचे प्रशासन सुरळीत चालावे म्हणून अष्टप्रधान मंडळाची स्थापना केली व पेशवा, अमात्य, मंत्री, सुमंत, सचिव, पंडितराव, न्यायाधीश व सेनापती (सरनोबत) ही पदे निर्माण केली.

छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यू १६८० साली झाला. त्यानंतर मराठ्यांच्या स्वराज्याची घडी विस्कळीत होते की काय असे चित्र निर्माण झाले होते. शिवाजी महाराजानंतर त्यांचे पुत्र संभाजी राजे यांनी काही काळ मराठ्यांचे नेतृत्व केले. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांचे राज्य काबीज करण्याची सुवर्णसंधी आहे असे मुघल सम्राट औरंगजेबास वाटले. मात्र, मराठ्यांनी मुघल सत्तेस निकराने लढा दिला व हा औरंगजेबाचा खोटा भ्रम आहे असे सिद्ध केले. संभाजीच्या हत्येनंतर शिवाजी महाराजांचे दुसरे पुत्र राजाराम यांनी मुघलांविरुद्ध लढा सुरू ठेवला. राजारामाचा इसवी सन १७०० साली मृत्यू झाला व त्यानंतर त्यांची पत्नी ताराबाई हिने देखील मुघलांचे मनसुबे पूर्ण होऊ दिले नाहीत. औरंगजेबाने तर कुठल्याही परिस्थितीत मराठ्यांचा पाडाव करावा असा जणू पण केला होता. मुघलांना अहमदनगर, विजापूर व दख्खनेतील इतर मुस्लीम सत्तांचा पराभव तर करता आला, मात्र मराठ्यांचा पाडाव हे त्याचे दिवा स्वप्नच राहिले. औरंगजेब मराठ्यांना हरविण्यासाठी एवढा पछाडलेला होता की, तो मुघलांची राजधानी दिल्ली सोडून स्वतः दख्खनमध्ये आला व महाराष्ट्रात तळ ठोकून होता. शेवटी १७०७ मध्ये औरंगजेबाचा मराठ्यांसोबत लढा चालू असताना दख्खनमध्ये मृत्यू झाला. ही घटना म्हणजे मराठ्यांच्या शौर्याची, चिकाटीची व स्वराज्य प्रेमाची प्रचीती व साक्ष देणारी घटना होय असे म्हणणे वावगे ठरू नये. १६८० ते १७०७ अशा २७ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीत शिवाजी महाराजांसारख्या राजाचे छत्र डोक्यावर नसताना देखील औरंगजेबासारख्या अनुभवी सम्राटाविरुद्ध लढा देऊन स्वराज्याचे रक्षण करण्याची किमया मराठ्यांनी केली. ह्याचे श्रेय शिवाजी महाराजांसारख्या द्रष्ट्या राजास द्यावे लागेल. कारण त्यांनीच खऱ्या अर्थाने महाराष्ट्रासारख्या कणखर देशातील लोकांना मराठी अस्मिता व स्वराज्याची जाणीव करून दिली.

औरंगजेबाला जरी मराठ्यांना हरवता आले नसले तरी अगोदर नमूद केल्याप्रमाणे त्याने संभाजीसारख्या योद्ध्याला ठार केले व त्यांची पत्नी येसूबाई व मुलगा शाहू यांस बंदी करून उत्तरेस पाठविले होते. इसवी सन १७०७ मध्ये मराठ्यांमध्ये फूट पाडून त्यांचे राज्य काबीज करता येऊ शकेल काय ह्याची चाचपणी करण्यासाठी वयात आलेल्या शाहूची मुघलांनी सुटका केली व तो महाराष्ट्रात आला.

शाहू महाराष्ट्रात आल्यावर अर्थात त्याला ताराबाईने विरोध केला व त्या दोघांमध्ये एका प्रकारे यादवी सुरू झाली. शाहूला यावेळी सर्वात जास्त मदत झाली ती म्हणजे बाळाजी विश्वनाथ या बुद्धिवान व्यक्तीची. बाळाजी विश्वनाथांचा शाहूला मराठा सत्तेचा खरा वारस ठरविण्यात व राजा बनविण्यात सिंहाचा वाटा होता.

बाळाजी विश्वनाथ हे अतिशय तल्लख बुद्धीचे चितपावन ब्राह्मण होते. ह्यांचे पूर्वज जंजिऱ्याच्या सिद्धींचे वंशपरंपरागत 'देशमुख' होते. 'देशमुख' ही त्या काळातील पदवी असून ह्यांना राज्याच्यावतीने महसूल गोळा करण्याचे अधिकार होते. बाळाजी विश्वनाथांचे पूर्वज 'श्रीवर्धन' ह्या परिसराचे देशमुख होते. श्रीवर्धन हे गाव सध्याच्या रायगड ह्या जिल्ह्यात आहे. कालांतराने जंजिऱ्याच्या सिद्धींसोबत जमेनासे झाल्यावर बाळाजी विश्वनाथ घाटावर आले व विविध मराठा सरदारांच्या दरबारी

आपली सेवा दिली. ह्याच बाळाजी विश्वनाथांनी शाहूला पाठबळ दिले व ताराबाईचा सेनापती धनाजी जाधव यास शाहूच्या गोटात आणण्याची किमया केली. त्यानंतर त्यांनी मराठा आरमाराचे सर्वेसर्वा कान्होजी आंग्रे यांना देखील शाहूच्या बाजूला वळविले. बाळाजींची सर्वात महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्यांनी दिल्लीच्या राजकारणात व उत्तरेत मराठ्यांचा दबदबा निर्माण केला. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर सैरभैर झालेल्या मुघल सत्तेवर मराठ्यांचा अंकुश निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम बाळाजी विश्वनाथांनी केले. औरंगजेबानंतर दिल्लीच्या सत्तेच्या राजकारणात अतिशय महत्त्वाची भूमिका बजाविणाऱ्या हुसेन अली व अब्दुल्ला खान ह्या सैय्यद बंधूंना हाताशी धरून बाळाजींनी मराठ्यांच्या दख्खनेतील सहा सुभ्यांमधील चौथ (Chauth) व सरदेशमुखी गोळा करण्याच्या हक्कांवर मुघलांची मोहोर लावून त्यांना येथील खरे शासक मराठेच व अनुषंगाने शाहू महाराजच होत हे मानण्यास भाग पाडले. अशा ह्या राजकारणाची उत्तम जाण असणाऱ्या बाळाजींनी शाहूचे महाराष्ट्रातील स्थान भक्कम केले व मराठ्यांच्या स्वराज्यातील यादवी संपविण्याचे देखील महत् कार्य पूर्ण केले. अशा ह्या स्वकर्तृत्वावर व बुद्धिमत्तेच्या जोरावर महाराष्ट्राच्या इतिहासात आपले स्थान निर्माण करणाऱ्या बाळाजींचा मृत्यू २ एप्रिल १७२० रोजी झाला.

बाळाजी विश्वनाथांच्या मृत्यूनंतर शाहू महाराजांनी थोरल्या बाजीरावांना आपला पेशवा म्हणून नियुक्त केले. थोरले बाजीराव यांचा जन्म १८ ऑगस्ट १७०० रोजी झाला होता. त्यामुळे त्यांनी जेव्हा पेशवेपदाची सूत्रे स्वीकारली तेव्हा त्यांचे वय अवघ्या एकोणीस ते वीस वर्षांचे होते. एवढ्या लहान वयात देखील त्यांना निष्णात योद्ध्याप्रमाणे युद्धनीती व कुशल प्रशासकाप्रमाणे प्रशासनाची जाण होती. सर्वात महत्त्वाचे म्हणजे थोरल्या बाजीरावांना दूरदृष्टी होती. ह्यांचेच मराठ्यांच्या सत्तेचे झेंडे अटकेपार लावण्याचे व हिंदूपदशाही वा हिंदू राष्ट्र निर्माण करण्याचे स्वप्न होते. थोरल्या बाजीरावांना अवघ्या चाळीस वर्षांचे आयुष्य लाभले व एकोणीस ते वीस वर्षे पेशवाईची सूत्रे हाताळता आली. मात्र, हा त्यांचा कार्यकाल म्हणजे महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण भारताच्या इतिहासातील एक झंझावाती काल होता. थोरल्या बाजीरावांच्या ठायी त्यांच्या पिताश्री प्रमाणे तल्लख बुद्धिमत्ता तर होतीच मात्र कितीही मोठ्या शत्रूबरोबर दोन हात करण्याचे धाडसदेखील होते. म्हणूनच त्यांचा उल्लेख अनेक अभ्यासक धाडसी व शूरवीर पेशवा म्हणून करतात.

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांना कोणते खंबीर नेतृत्व लाभले असेल तर ते थोरल्या बाजीरावांचे होते असे म्हणणे वावगे ठरणार नाही. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुघल सम्राज्याची वाताहात होण्यास सुरुवात झाली. अनेक पूर्वाश्रमीच्या मुघल सुभेदारांनी आपले स्वातंत्र्य घोषीत करून स्वतःचे राज्य निर्माण करण्याचा धडाका लावला होता. १८ व्या शतकात बंगाल व हैदराबादसारखे प्रांत मुघल साम्राज्यापासून वेगळे झाले होते. असक जहा निझाम-उल-मुल्क ह्या दख्खनेतील मुघल सुभेदाराने याच काळात हैदराबादच्या संस्थानाची स्थापना केली व मुघलांना हा फार मोठा धक्का होता. याच निझामाने मराठ्यांच्या भारतातील राजकारणात वाढणाऱ्या प्रभावाला विरोध करण्याचा प्रयत्न केला होता. थोरल्या बाजीरावांनी ६ मार्च १७२८ रोजी पालखेड येथे निजामाच्या सैन्यास गाठले व त्याचा दारूण पराभव केला व त्याला त्याची जागा दाखवून दिली होती. ह्या पराभवानंतर निजामाने मराठ्यांसोबत मुणगी-शिवगावचा तह केला व मराठ्यांचा दख्खनेतील व एकंदरीतच भारताच्या राजकारणातील निर्विवाद स्थान व वर्चस्व स्वीकारले, नव्हे त्यास थोरल्या बाजीरावांनी तसे करण्यास भाग पाडले. ही त्यांच्या तलवारीची व शौर्याची किमया होती. अगोदर नमूद केल्याप्रमाणे बाळाजी विश्वनाथांनी दिल्लीपर्यंत मराठा सत्तेची कीर्ती पसरविण्याचे कार्य केले होते. परंतु त्यांचे पुत्र थोरले बाजीराव यांनी तर थेट तापी व नर्मदा नदी पार करून मध्य भारतापर्यंत मराठ्यांच्या

फौजा दौडवल्या. माळवा हा प्रांत सध्याच्या मध्यप्रदेश ह्या राज्यात असून हा प्रांत साधारणतः वायव्य मध्यप्रदेशात असून राजस्थान, गुजरात व दख्खनेला जोडणारा दुवा होय. माळवा प्रांतावर मराठ्यांचे वर्चस्व असावे असे बाळाजी विश्वनाथांना मनोमन वाटत होते. त्यामुळेच त्यांनी आपले राजनैतीक कौशल्य वापरून माळवा प्रांतातील चौथ (Chauth) व सरदेशमुखीचे हक्क मराठ्यांना प्राप्त व्हावेत यासाठी १७१९ मध्ये प्रयत्न केले होते. तेव्हा त्यांना त्यात यश आले नाही. आपल्या पित्यास जे करता आले नाही ते थोरल्या बाजीरावांनी आपल्या व आपले बंधू चिमाजी अप्पा यांच्या पराक्रमाच्या जोरावर घडवून आणले. मार्च १७३० मध्ये मुघल सुभेदार सरबुलंद खान याने मराठ्यांचे माळव्यातील वर्चस्व एका तहाद्वारे मान्य केले.

थोरल्या बाजीरावांना एक गोष्ट चांगलीच ठावूक होती की, भारतातील व प्रामुख्याने इतर भारतातील विविध हिंदू राजे हे मराठ्यांचे नैसर्गिक मित्र होत. त्यामुळे थोरल्या बाजीरावांचा कल हिंदू राजांना, उमरावांना व जहागिरदारांना मदत करण्याकडे असे. ह्याचे समर्पक उदाहरण म्हणजे त्यांनी मध्य भारतातील बुंदेला राजा वा प्रमुख छत्रसाल ह्याला केलेली मदत होय. बुंदेला ह्या राजपूत वंशाने अकबर, जहांगिर व इतर मुघल सम्राटांविरुद्ध निकराची झुंज दिली होती. मोहम्मद खान बंगश हा जेव्हा मुघलांच्या अलाहाबाद ह्या सुभ्याचा सुभेदार झाला तेव्हा त्याने तत्कालीन बुंदेला राजा छत्रसाल ह्याच्यावर आक्रमण करून त्याची परिस्थिती बिकट केली. अशावेळी छत्रसालाने मराठ्यांना मदतीचे आवाहन केले व थोरले बाजीराव लागलीच ह्या स्वाभिमानी हिंदू राजाच्या मदतीस धावून गेले. १७२८ साली मराठ्यांचे सैन्य बुंदेलखंडात जाऊन थडकले व मुघल सुभेदाराने बळकावलेला प्रदेश छत्रसालास परत मिळवून दिला. थोरल्या बाजीरावांच्या ह्या कृतीमुळे छत्रसाल राजा एवढा उपकृत वा कृतज्ञ झाला की, त्याने पेशव्यांच्या विषयीची आपली प्रेमभावना व एका अर्थाने निष्ठा दाखवून देण्यासाठी विशेष दरबार भरविला. एवढेच नव्हे, तर त्याने थोरल्या बाजीरावांना व पर्यायाने मराठी सत्तेला कल्पी, सागर, झासी, व हिर्देनगर ही ठिकाणे जहागिरी म्हणून बहाल केली. असे म्हटले जाते की, छत्रसालाने थोरल्या बाजीरावांना 'मस्तानी' नामक एक सुंदर मुस्लीम नर्तकीदेखील नजराणा म्हणून दिली होती.

थोरल्या बाजीरावांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्याकडे कुशल नेतृत्व होते व माणसे व त्यांच्यातील गुण ओळखण्याचे कसब होते. त्यामुळेच त्यांनी होळकर व शिंदे ह्यांच्यासारखे सरदार मराठा सैन्यात दाखल करून घेतले वा आणले. होळकरांच्या घरातील सर्वात प्रसिद्ध पुरुष मल्हारराव होळकर हे होत. मल्हाररावांनी माळव्याच्या लढ्यात तसेच अवध प्रांतात मराठ्यांचे सैन्य नेऊन मुघलांचा थरकाप उडवून दिला होता. नंतरच्या काळात हेच होळकर घराणे इंदौरच्या संस्थानाचे राज्यकर्ते घराणे म्हणून पुढे आले. ह्याच घराण्यातील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी भारतातील विविध ठिकाणी भव्य मंदिरे, देवालये व घाट बांधलेले आढळतात. शिंद्यांच्या घराण्यात दत्ताजी व महादजी शिंदे यांसारखे योद्धे होऊन गेले. महादजी शिंदे यांना पानिपतच्या तिसऱ्या लढाईनंतर (१७६१) भारताच्या राजकारणात मराठ्यांचे स्थान पुनश्च भक्कम करण्याचे काम केले असे म्हणणे अतिशयोक्ती होणार नाही. अशा विविध सरदार घराण्यांच्या शौर्यामुळेच मराठी सत्ता भरताच्या राजकीय पटकावर राज्य गाजवू शकली वा महत्त्वाची भूमिका बजावू शकली व याचे पूर्ण श्रेय थोरल्या बाजीरावांनाच जाते.

थोरल्या बाजीरावांनी व अनुषंगाने मराठा सैन्यांने हैद्राबादच्या निझामाने पुन्हा एकदा तोंड वर काढण्याचा प्रयत्न केला असता त्याचा भोपाळच्या लढाईत (डिसेंबर १७३७) पुन्हा एकदा पराभव केला. या पराभवानंतर जानेवारी १७३८ मध्ये निजामाने मराठ्यांसोबत दुराह सराईचा तह केला व मराठ्यांचे निर्विवाद वर्चस्व पुन्हा

यश न मिळणे याचा अर्थ अपयशी होणे असा नाही.

एकदा स्वीकारले. त्याचप्रमाणे युद्ध नुकसान भरपाई म्हणून पन्नास लाख रुपये एवढी मोठी रक्कम मराठ्यांना देण्याचे मान्य केले. हा तह म्हणजे निजामाची मोठी मानहानीच होती व असे करणे थोरल्या बाजीरावांमुळेच शक्य झाले.

थोरल्या बाजीराजांची कारकीर्द लढाया, शत्रूचा पराभव व पराक्रमाने ओतप्रोत भरलेली आढळते. शत्रुला धक्का देऊन ते आश्चर्यकारीत करण्याचे तंत्र देखील त्यांना चांगलेच अवगत होते. याबाबतचे उदाहरणच द्यायचे म्हणजे बाजीरावांनी २९ मार्च १७३७ रोजी मुघलांची राजधानी दिल्लीत केलेला प्रवेश होय. मल्हारराव होळकर अवध व उत्तर भारतात पराक्रम गाजवत असताना थोरल्या बाजीरावांनी थेट दिल्लीत धडक मारली व मुघल सम्राटाचा थरकाप उडवून दिला. थोरले बाजीराव ह्यावेळी दिल्लीत फक्त तीनच दिवस तळ ठोकून होते. मात्र ह्या तीन दिवसांत मुघलांना घाम फुटला होता.

थोरल्या बाजीरावांविषयी अनेक इतिहासकारांनी मते मांडली आहेत व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा ठाव घेण्याचा प्रयत्न केला आहे. अनेक अभ्यासक व इतिहासकारांमध्ये एकमत आहे की, त्यांनीच खऱ्या अर्थाने मराठ्यांच्या सत्तेचा झेंडा भारतीय स्तरावर फडकविण्याचे काम केले. काव्यमय भाषेत म्हणावयाचे झाल्यास असे म्हणावे लागेल की, शिवाजी महाराजांनी रचलेल्या पायावर इमारत बांधून कळस चढविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य थोरल्या बाजीरावांनी पार पाडले. शाहू महाराजांना एका छोट्या राज्याच्या राजापासून भारतातील विविध भागांवर प्रभाव असणारा राजा बनविण्याचे काम देखील त्यांनीच केले. अर्थात, शाहू महाराजांनी देखील थोरले बाजीराव अवघे वीस वर्षांचे असतानाच त्यांच्यातील हे धडाकेबाज गुण ओळखले होते व त्यांना पेशवा म्हणून नियुक्त केले होते. सर यदुनाथ सरकार यांच्यासारख्या महान इतिहासकाराने थोरल्या बाजीरावांची तुलना त्यांचे इंग्लंडचे समकालीन पंतप्रधान सर रॉबर्ट वालपोल (Sir Robert Walpole) यांच्याशी केली आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे सर रॉबर्ट वालपोल यांनी ज्याप्रमाणे इंग्लंडमध्ये पंतप्रधानांना कोणीही आव्हान देऊ शकणार नाही असे भक्कम स्थान निर्माण केले, अगदी त्याचप्रमाणे थोरल्या बाजीरावांनी पेशवा या पदाचा मान तर वाढविलाच मात्र हे पद मजबूत केले व त्याला प्रतिष्ठा मिळवून दिली. काही इतिहासकार त्यांचा उल्लेख लढवय्या पेशवा, शिस्तबद्ध शिपाई व कुशल सेनापती म्हणून करतात. असे म्हटले जाते की, थोरले बाजीराव अनेक वेळा न थकता घोडेस्वारी करू शकत होते. अनेक वेळा ते घोड्यावरच आपली झोप घेत असत असे देखील काही लोक मानतात. त्याचप्रमाणे घोडा पळत असताना थोरले बाजीराव घोड्याची लगाम सोडून शेतातील मका वा इतर कणसे तोडून हाताने चोळून खात असत व घोड्यासही चारत असत. हे सर्व चालू असताना त्यांचे घोड्यावरील नियंत्रण थोडेदेखील सुटत नसे. मुघल सम्राटाने थोरल्या बाजीरावांच्या विषयीच्या ह्या कथा ऐकल्यावर त्याच्या तोंडचे पाणी पळाले होते असे म्हणतात.

अशा ह्या थोरल्या बाजीराव नामक पेशव्याचा संपूर्ण मराठी मुलुखात व भारतात दरारा नसेल तरच नवल. असे म्हटले जाते की, ह्या अतिशय देखण्या, लढवय्या, राजबिंड्या व मर्दानी व्यक्तिमत्त्वाविषयी अनेकांच्या मनात दरारा होता. त्याचे व्यक्तिमत्त्व अतिशय रांगडे होते. थोरल्या बाजीरावांची कारकीर्द म्हणजे महाराष्ट्राच्या इतिहासातील व भारताच्या इतिहासातील मैलाचा दगड व सुंदर दागिना होय यात काहीच वाद नाही. मराठ्यांना संपूर्ण भारतात मान मिळवून देण्याचे श्रेय देखील त्यांनाच जाते.

१७३९ साली जेव्हा पर्शियाचा सम्राट नादिरशहा याने दिल्लीवर स्वारी केली तेव्हा छत्रपती शाहूंची बाजीरावांनी मुघलांना मदत करावी अशी अपेक्षा होती. त्यानुसार शाहूंनी बाजीरावांना उत्तरेत फौजा घेऊन जाण्याची आज्ञा केली. मात्र, २५ मे १७३९ रोजी मध्य प्रदेशातील बुऱ्हाणपुरजवळील जैनाबाद येथे एक दूत बाजीरावांना भेटला. ह्या दूताने संदेश दिला की, एप्रिलच्या सुरुवातीला

नादिरशहा परत गेला. त्यामुळे बाजीरावांचा दिल्लीकडे जाण्याचा बेत फिरला. जर थोरले बाजीराव त्यावेळी वेळेत दिल्लीपर्यंत जाऊ शकले असते तर नक्कीच त्यांच्या हस्ते नादिरशहाचा पराभव झाल्याचे दृष्य दिल्लीकरांना पाहाता आले असते! अर्थात, इतिहासात जर-तरच्या गोष्टींना महत्त्व नसते. मात्र, थोरल्या बाजीरावांचे नेतृत्व व कर्तृत्व एवढे अफाट होते की, लेखकाचा इतिहास हा विषय असून देखील अशा प्रकारची जर-तरची भाषा वापरण्याचा मोह आवरत नाही.

थोरल्या बाजीरावांच्या अफाट कामगिरीमुळेच एच.जी. रॉबीन्स यांनी त्यांना मराठ्यांचे शिवाजी महाराजानंतरचे दुसरे महान पुरुष असे म्हटले आहे. ("Maratha caste produced the second great man in the form of Peshwa Baji Rao after Shivaji")

इतिहास व ललित लेखनात फार मोठा फरक आहे. ललित लिखाण करताना लेखकाला आपल्या काव्यमय व कल्पित गोष्टींचा देखील उपयोग करण्याचे स्वातंत्र्य असते. मात्र, इतिहासकाराला असे करता येत नाही. इतिहासकाराला साधनांच्या (लिखीत, पुरातत्त्वीय इत्यादी) आधारेच इतिहास लिहावा लागतो. इतिहासकाराला जे सत्य आहे तेच मांडावे लागते; मग ते सत्य कटू असले तरी लिहावेच वा सांगावेच लागते. मराठीमध्ये ललित स्वरुपात (प्रामुख्याने कादंबऱ्या व नाटके) अनेक ऐतिहासिक घटना व व्यक्तींवर आधारित लिखाण झाले आहे. उदाहरण द्यायचे झाले तर रणजित देसाई, ना. स. इनामदार, शिवाजी सावंत आदी लेखकांनी थोरले माधवराव, थोरले बाजीराव, संभाजीराजे इत्यादी ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वे त्यांच्या कादंबऱ्यांमधून अजरामर केली आहेत. थोर इतिहासकार सेतु माधवराव पगडींना यांच्या 'इतिहास आणि कथित' या पुस्तकाच्या आधारे असे सांगावेसे वाटते की, इतिहासाविषयी गोडी लागण्यासाठी वाचकांनी अशा ऐतिहासिक कादंबऱ्यांपासून सुरुवात करण्यास हरकत नाही. त्यामुळेच वाचकांना असे सुचवावेसे वाटते की, त्यांनी थोरल्या बाजीरावांच्या जीवनावर आधारित ना. स. इनामदार लिखीत 'राऊ' ही कादंबरी अवश्य वाचावी.

महाराष्ट्राने देशाला पुरातन काळापासून जी काही महान नररत्ने दिली त्यात थोरल्या बाजीरावांचे नाव निश्चितच फार वरच्या क्रमावर आहे. शिवाजी महाराजांनी सुरू केलेल्या कार्याला फार पुढे नेण्याचे व महाराष्ट्राची व मराठी कणखरपणाची ओळख संपूर्ण देशाला करून देण्याचे श्रेय निश्चितच थोरल्या बाजीरावांना जाते. थोरल्या बाजीरावांचा जीवनपट एवढ्या विविधतेने व अचाट घटनांनी भरलेला आहे की, एका लेखात तो पूर्ण करणे जवळ-जवळ अशक्यप्राय आहे. मात्र, जो कोणी त्यांच्या झंझावती कारकीर्दीचे व जीवनविषयक विस्तृत माहितीचे वाचन करील त्यास मजा तर येईलच मात्र एक वेगळेच स्फुरण चढेल. वाचकांनी लेखाच्या शेवटी दिलेल्या संदर्भ ग्रंथांचे वाचन केल्यावर त्यांना निश्चितपणेच थोरल्या बाजीरावांविषयी अजून रोचक माहिती मिळेल यात वाद नाही. महाराष्ट्राच्या इतिहासातील अशा ह्या थोरले बाजीराव नामक महान 'श्रीमंतास' मानाचा मुजरा!

**संदर्भ ग्रंथ** :


- मराठी रियासत खंड ३ : गोविंद सखाराम सरदेसाई
- अ न्यु लूक ॲट मॉडर्न इंडियन हिस्ट्री : बी. एल. ग्रोव्हर व एस. ग्रोव्हर
- न्यू हिस्ट्री ऑफ द मराठाज् : जी. एस. सरदेसाई
- हिस्ट्री ऑफ मेडिविअल इंडिया : व्ही. डी. महाजन
- वंडर दॅट वॉज इंडिया खंड-२: एस. ए. ए. रिझवी



**सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**

उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख

जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.

भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६

Email :subhashinscotland@gmail.com


•••

# ऐच्छिक रक्तदान : निरोगी राहाण्याचे भान व गरजूंचे प्राण वाचविणारे वरदान

*रक्तदानाचे महत्त्व या लेखात विशद केले आहे - संपादक*

रक्त हा आपल्या शरीरातील महत्त्वाचा व प्राणरक्षक घटक आहे.अचानक उद्‌भवणा-ऱ्या घटना जशा की, मोठा अपघात, मोठी शस्त्रक्रिया, गर्भपात, मुदतपूर्व प्रसूती, विषबाधा, तीव्र भाजणे, औषधांची तीव्र रिॲक्शन इत्यादीमध्ये रक्त चढविणे गरजेचे असते. तर सिकलसेल ॲनिमिया, अप्लास्टिक ॲनिमिया, रक्ताचा कॅन्सर, किमोथेरापी चालू असलेले काही रूग्ण, हिमोफिलीया तसेच थॅलेसेमियाग्रस्त रूग्णांना नियमितपणे रक्त चढविणे हाच त्यांचा जीव वाचविण्याचा एकमेव उपाय आहे.असे हे रक्त कृत्रिमरित्या तयार करता येत नाही; तसेच दान केलेले रक्त जास्त काळपर्यंत साठवून ठेवता येत नाही. रक्ताच्या या अलौकिक गुणधर्मांमुळेच रक्तपेढ्या अस्तित्वात आल्या, ज्या रक्तदाता व गरजू यांच्यातील दुव्याचे काम करतात.

ह्या रक्तपेढ्यांमध्ये पात्रतेच्या सर्व चाचण्या पार केलेल्या रक्तदात्याचे निर्दोष रक्त आवश्यक त्या प्रक्रिया करून संपूर्ण स्वरूपात किंवा रक्ताचे पृथःकरण करून त्याच्या घटकांच्या जसे की, लाल रक्तपेशी, प्लेटलेट्स, प्लाझ्मा, क्रायोप्रेसिपीटेट्स इत्यादी स्वरूपात साठविले जाते.इतके सर्व करूनही संपूर्ण रक्त किंवा रक्तघटकांची आयुर्मर्यादा कमी असल्यामुळे कोणत्याही रक्तपेढीमध्ये नियमितपणे रक्त पुरवठा होणे गरजेचे ठरते, तरच गरजू रूग्णाची रक्ताची किंवा इतर रक्तघटकांची गरज भागू शकते.म्हणूनच, नियमित व ऐच्छिक रक्तदान ही काळाची गरज व सामाजिक जबाबदारी आहे. ऐच्छिक रक्तदानामध्ये निरोगी व्यक्तर फक्त आपले कुटुंबीय, नातेवाईक किंवा मित्रपरिवारात उद्‌भवलेल्या आपत्कालीन परिस्थितीमध्येच रक्तदान न करता, दर तीन महिन्यांनी रक्तदान शिबिरात सहभागी होऊन अथवा स्वतः रक्तपेढीमध्ये जाऊन रक्तदान करते.रक्तदानाच्या इतर प्रकारांपेक्षा ऐच्छिक रक्तदानाद्वारे मिळालेले रक्त अधिक सुरक्षित समजले जाते.कारण येथे रक्तदात्याला त्याच्या निरोगी असण्याची खात्री असते, त्याचा रक्तदानाचा हेतू शुद्ध व स्पष्ट असतो आणि रक्तदात्यावर परिस्थितीचा तसेच इतर कोणताही दबाव नसतो.

रक्तदान ही एक सुरक्षित प्रक्रिया आहे. ह्या प्रक्रियेमध्ये प्रत्येक रक्तदात्यासाठी निर्जंतूक सुई वापरली जाऊन नंतर ती लगेचच नष्ट केली जाते. रक्तदानाच्या चार सोप्या पायऱ्या आहेत :- १)नाव नोंदणी, २) मेडीकल हिस्ट्री व शारीरिक तपासणी (वजन, उंची, टेंपरेचर, पल्स, ब्लड प्रेशर, रक्तातील हिमोग्लोबीन इ.), ३) रक्तदान, ४) थोडी विश्रांती व अल्पोपहार. या सर्व प्रक्रियेसाठी फक्त तासाभराचा अवधी लागतो. त्यानंतर लगेचच आपण आपले रूटीन सुरू करू शकतो. हे दान केलेले रक्त एड्स, हेपिटायटीस बी व सी, सिफीलीस व इतर संसर्गजन्य रोगांच्या चाचण्यांसाठी तपासले जाते व नंतरच साठविले जाते.

अशाप्रकारे, निरोगी असण्याचे निकष जसे की, वयोमर्यादा १८ ते ६५ वर्षे, ४५ किग्रॅपेक्षा जास्त वजन, १२.५ ग्रॅ/डीएल पेक्षा जास्त रक्तातील हिमोग्लोबीन असेल आणि मलेरिया, टायफॉइड व इतर संसर्गजन्य रोग नसलेली कोणतीही व्यक्ती यशस्वीरित्या ऐच्छिक रक्तदान करू शकते. रक्तदानानंतर रक्तदात्याच्या शरीरात लगेचच नवीन रक्ताची निर्मिती सुरू होते व त्या-त्या रक्तघटकांनुसार काही दिवस ते काही आठवड्यांमध्ये दान केलेल्या रक्ताची तूट भरून निघते व ती व्यक्ती पुन्हा तीन महिन्यांनंतर रक्तदान करू शकते.

**रक्तदानाआधी घ्यावयाची काळजी :**

१) रक्तदानास येताना ३ ते ४ तासात न्याहारी केलेली असावी अथवा भोजन केले असल्यास एक तासानंतर रक्तदान करावे.

२) रक्तदानापूर्वी भरपूर पाणी किंवा इतर द्रव पदार्थ प्यावे.

३) कपडे सैलसर असावेत.

**रक्तदानानंतर घ्यावयाची काळजी :**

१) रक्तदानानंतर १५ ते २० मिनिटे आराम करावा, पाणी प्यावे व दिलेला अल्पोपहार घ्यावा.

२) रक्तदानानंतर ४ ते ५ तास भरपूर पाणी किंवा इतर द्रव पदार्थ घ्यावे व उपाशी राहू नये.

३) रक्तदानानंतर नेहमीची कामे करू शकतो, पण खूप कष्टाची कामे करू नयेत.

**रक्तदानाचे फायदे :**

१) रक्तदात्याला रक्त गट व हिमोग्लोबीनचे प्रमाण कळते.

२) छोटी वैद्यकीय तपासणी (वजन, उंची, टेंपरेचर, पल्स, ब्लड प्रेशर) होते.

३) रक्ताची मलेरिया, एड्स, हेपिटायटीस बी व सी, सिफीलीस व इतर संसर्गजन्य रोगांसाठी चाचणी केली जाते.

४) शरीरात नवीन रक्त तयार करण्याची कार्यक्षमता व रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

**रक्तदानासाठी अपात्रतेचे निकष :**

१) गर्भवती महिला, ६ महिन्यात गर्भपात झाला असल्यास आणि स्तनपान करणाऱ्या महिला

२) मागील ५ दिवसात मासिक पाळी आली असल्यास

३) ६ महिन्यात मोठी शस्त्रक्रिया झाली असल्यास

४) मागील एक वर्षात टायफॉइड, कावीळ किंवा श्वानदंश होऊन रेबीजची लस घेतली असल्यास

५) मागील ३ दिवसात प्रतिजैविक किंवा वेदनाशामक औषध घेतले असल्यास

६) मागील २४ तासात मद्यपान केले असल्यास

**रक्तदानासाठी कायमचे बाद उमेदवार :**

कर्करोग, मधुमेह, हृदयरोग, हेपिटायटीस बी व सी, मूत्रपिंड रोग, कुष्ठरोग, यकृताच्या व्याधी, क्षय, दमा किंवा एड्स असल्यास.

चला तर मग एक पाऊल पुढे टाकू या, ऐच्छिक रक्तदान करू या !

तुम्ही केलेल्या एका ऐच्छिक रक्तदानामुळे एक ते तीन रुग्णांना जीवनदान मिळू शकते !

रक्तदान जीवनदान!

**सौ. स्मिता अमोल लिमये**
मो. ९९८७००४०५८

•••



प्रत्येकाच्या अंगी कोणती ना कोणती खुबी लपलेली असते ती ओळखा आणि त्याचा पाठपुरावा करा. स्वतःची ओळख करून घ्या आणि आपल्या अंगी लपलेले चांगले गुण जगासमोर मांडा. खूप फायदा होईल.

# परिसर वार्ता

**- संकलित**

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**तारांकित महाविद्यालय योजनेअंतर्गत चार विभागांना विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाचे आर्थिक पाठबळ**

वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र आणि प्राणीशास्त्र या विभागांना विद्यार्थ्यांमध्ये संकल्पनात्मक स्पष्टता, वैज्ञानिक संशोधनाचा विकास आणि सर्जनशीलता वाढीस लागावी म्हणून भारत सरकारच्या विज्ञान व अंतर्गत ठरावीक आर्थिक मदत घोषित झाली आहे. ठाणे जिल्ह्यांतर्गत हा बहुमान मिळणारे बांदोडकर हे दुसरे महाविद्यालय आहे.

या योजनेअंतर्गत महाविद्यालयाला २८ लाख रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे. या अनुदानातर्फे विद्यार्थ्यांकरिता नियमित अभ्यासक्रमाच्या इतर अनेक प्रकारचे प्रयोग, मार्गदर्शनपर व्याख्याने, कार्यशाळा इ. व्दितीय व तृतीय वर्ष विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांकरिता आयोजित करण्यात आले होते.

या निमित्ताने डॉ. जयदीप मुखर्जी वरिष्ठ संशोधक NASA, यांचे व्याख्यान, विविध शैक्षणिक सहली, आकाश निरीक्षण, सामाजिक जाणीवेच्या दृष्टीने निर्माल्यामुळे तलावातील पाण्याचा ऑक्सिजनवर होणारा परिणाम, पक्षी निरीक्षण, कीटकांचे विविध भागांचे निरीक्षण त्याचप्रमाणे पदवी विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळी प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली. त्यांत प्रामुख्याने निसर्गपूरक रसायनांची निर्मिती, प्रयोगशाळेतील काचेची उपकरणे हाताळणे, क्लिनिकल रिसर्च मधील करिअर संधी, नेट/सेट/गेट स्पर्धा परीक्षा यांवर कार्यशाळा, प्रयोगशाळेतील रसायने बनवणे, रासायनिक प्रकल्पाला भेट तसेच विद्यार्थ्यांच्या विषयांची आवड निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. तसेच विभागांतील अधिव्याख्याता यांनी नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या जागतिक जैवतंत्रज्ञान शिखर परिषद २०१६ येथे सक्रिय सहभाग घेतला व नोबल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळाली.

**‘आर्द्रभूमी २०१६’**

पाणथळ जमिनी पुरवीत असलेल्या विविध सेवा या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे ‘आर्द्रभूमी २०१६’ सेवेवरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन. दिनांक १६ आणि १७ फेब्रुवारी रोजी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या थोरले बाजीराव पेशवे सभागृहात प्राणीशास्त्र आणि पर्यावरणशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने आणि Sacon,कोईम्बतुर व Mangrove Cell, मुंबई Mangroves society of India यांच्या सहकार्याने उपरोक्त विषयावर एका आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. आर्द्रभूमी आणि त्यावर विसंबून असणारी सर्व जैव व्यवस्था यांची पर्यावरणाला व अर्थव्यवस्थेलादेखील एक मौल्यवान देणगी लाभली आहे. पाणथळ जमिनी जैवविविधतेची नैसर्गिक निवासस्थाने असून याचे अस्तित्व मानवी कारवायांमुळे धोक्यात येऊ लागले आहेत. नवीन बांधकामे, भराव, प्रदूषण, विविध कारखान्यांची टाकाऊ रासायनिके इत्यादींमुळे आर्द्रभूमीला धोका निर्माण झाला आहे. म्हणून ही मानवाचीच नैतिक जबाबदारी ठरते की पाणथळ जमिनींना संरक्षण देऊन त्यांचे संवर्धन करणे, तरुण पर्यावरणवाद्यांना, संशोधकांना त्यांचा दृष्टीकोन संशोधन

व नूतन अविष्कार मांडण्यासाठी ही परिषद म्हणजे विद्या प्रसारक मंडळाने उपलब्ध करून दिलेले एक व्यासपीठ आहे.

**अरण्यवाचन : जंगल कसे वाचाल?**

विश्वास भावे यांचे अरण्यवाचन : जंगल कसे वाचाल? हे व्याख्यान दि.२६ मार्च २०१६ रोजी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील पतंजली सभागृहात सायंकाळी ५.०० वाजता आयोजित करण्यात आले होते.

वन्यजीव पर्यटन हे गेल्या दशकापासून भारतातील एक लोकप्रिय आकर्षण ठरत असून वाघ हा त्या आकर्षणाचा केंद्रबिंदू आहे. परंतू बहुसंख्य पर्यटक निव्वळ वाघ पाहण्याच्या नादात जंगलातील इतर बहुतांश गोष्टींकडे दुर्लक्ष करतात. जंगल हे एखाद्या पुस्तकाप्रमाणे आहे. व वन्यजीव जंगलात त्यांच्या खाणाखूणा मागे ठेवून जातात त्या खुणांचा आणि त्या खुणांवरून घडलेल्या घटनांचा अनुमान काढण्याची कला म्हणजेच ‘अरण्यवाचन’ याविषयावर त्यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली.

**राष्ट्रीय पर्यावरण प्रज्ञा शोथ परीक्षेतील यश**

भारतीय पर्यावरण प्रज्ञा शोध परीक्षेमधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल कनिष्ठ महाविद्यालयातील एक विद्यार्थीनी ठाणे विभागातून प्राविण्यासह उत्तीर्ण झाली. दरवर्षी राष्ट्रीय स्तरावर या परीक्षेचे आयोजन केले जाते. गोवा हे या परीक्षेचे मुख्य ठिकाण आहे. MIFFEE या विद्यापीठाव्दारे दरवर्षी या परीक्षेचे आयोजन केले जाते. या परीक्षेसाठी नेहमीच प्रचंड प्रतिसाद विद्यार्थ्यांकडून मिळत असतो. पर्यावरण शिक्षण हे उच्च न्यायालयाने एक अनिवार्य विषय म्हणून अभ्यासक्रमात समाविष्ट केले आहे व जागतिकीकरण आणि वसुंधरेचा विचार करता जगातील प्रत्येक नागरिकाने पर्यावरणाबाबत जागरूक राहिले पाहिजे म्हणून प्रथमवर्ष व व्दितीयवर्ष कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी या परिक्षेतून हा अभ्यास करून आपले ज्ञान अद्ययावत करीत असतात. दि. ६ फेब्रुवारी २०१६ रोजी महाविद्यालयाच्या पतंजली सभागृहात विशेष प्राविण्यासह यशस्वी झालेल्या ८० विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व पदके देऊन सन्मान करण्यात आला. अकरावी इयत्तेमधील श्रीरामुला नेहा शंकर पद्मा या विद्यार्थिनीने रजत पदक मिळवून महाविद्यालयाचे नाव पुन्हा यावर्षीही गोवा विद्यापीठात नोंदविले आहे.

**यु.जी.सी. CPE च्या योजने अंतर्गत निवड**

महाविद्यालयाने २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षात त्रिवेणी यश संपादन केले आहे. सप्टेंबर महिन्यात डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नोलॉजी तर्फे स्टार कॉलेज स्कीम अंतर्गत निवड़ नॅक समितीचा द्वितीय पुनर्मूल्यांकनात ‘अ’ दर्जा आणि आता विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे कॉलेज विथ पोटेन्शियल फॉर एक्सलन्स या योजने अंतर्गत महाविद्यालयाची निवड झाली आहे.

महाविद्यालयाचा सर्वांगिण विकासाचा आढावा जसे मूलभूत सोयी, शैक्षणिक सुविधा, संशोधन, प्रयोगशाळा, संशोधन प्रकल्प व पेपर्स, संशोधकांची व मार्गदर्शकांची संख्या, नॅकचा दर्जा, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीने शैक्षणिक उपक्रमाव्यतिरिक्त इतर खेळ सांस्कृतिक सामाजिक कार्यक्रम इत्यादींच्या बाबींचा विचार करून सदर निवड करण्यात येते. 'CPE' योजने अंतर्गत निवड झालेले बांदोडकर हे दुसरे महाविद्यालय आहे.

महाविद्यालयाच्या या यशामध्ये विद्या प्रसारक मंडळाची दूरदृष्टी व प्रोत्साहन याचा सिंहाचा वाटा आहे. याच बरोबर प्राचार्य, उपप्राचार्य, IQAC समन्वयक शिक्षक, शिक्षकेतर सहकारी, आजी व माजी विद्यार्थी या सर्वांच्या अथक परिश्रमांमुळे हे यश प्राप्त झाले आहे.

महाविद्यालयाच्या जडणघडणीत मुंबई विद्यापीठाबरोबरच सर्व ठाणेकरांसह अनेक संस्थांचे तसेच

---

माणसाच्या स्वभावाला औषध नाही. आपण कोणाचा स्वभाव कितीही बदलण्याचा प्रयत्न केला तर त्यात आपलीच हार आहे!

विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व संस्थांचे सहकार्य व प्रोत्साहन सतत लाभलेले असल्याने या सर्वांचे महाविद्यालय ऋणी आहे.

**अभिनंदन**

• महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांची **Executive Endeavor Fellowship** करिता ऑस्ट्रेलियन सरकारतर्फे निवड झाली आहे. ऑस्ट्रेलियाच्या डकिन विद्यापीठ येथील कला व शिक्षण विभागात ४ महिन्यांकरता त्यांची नियुक्ती झाली आहे.

**• रसायनशास्त्र विभागातील प्रा.प्रकाश माळी यांचा विविध कार्यक्रमांमध्ये सहभाग होता व त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. ते पुढील प्रमाणे-**

१. दि.२८ फेब्रु.२०१६ रोजी जनक्रांती साहित्य संस्था,. कोकण मराठी साहित्य परिषद आयोजित मराठी राजभाषा दिनी कविसंम्मेलन व काव्यवाचन स्पर्धेमध्ये सहभागी होऊन काव्यरचना सादर केल्याबद्दल बहिणाबाई साहित्य संस्था डोंबिवली यांच्यातर्फे सन्मानपत्र देण्यात आले.

२. वाहतूक विभाग़ ठाणे शहर यांच्या वतीने आयोजित २७ व्या रस्ता सुरक्षा अभियान २०१६अंतर्गत घेतलेल्या कॉलेज मुलांच्या वक्तृत्व व पथनाट्य स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना स्पर्धा यशस्वी करण्याच्या कामामध्ये सहकार्य केल्याबद्दल प्रमाणपत्र देण्यात आले.

३. दि.१० फेब्रु.२०१६ रोजी जोशी बेडेकर महाविद्यालय भाषा विभाग यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आंतरमहाविद्यालयीन ''मिर्जा गालिब सस्वर गजल पाठ''यामध्ये सहभाग घेतल्याबद्दल प्रशस्तीपत्र देण्यात आले.

४. शांतीदूत कला अभियान मुंबई यांच्यावतीने ''समाज शिरोमणी पुरस्कार २०१६'' बहाल करण्यात आला.

५. Friends International, यांच्यावतीने “Friends International Award 2016” प्रदान करण्यात आला.

६. दि.२४ जाने. २०१६ रोजी अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठान आनंद कल्याणकारी सामाजिक संस्था, यांच्यातर्फे ''कृतीशील शिक्षक पुरस्कार'' सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

• कुणाल भगवती सिंघवी (सिनिअर अंडर ऑफिसर) याची कझाकिस्थान येथे १६ मे २०१६ रोजी सुरुवात होणाऱ्या NCC Youth Exchange Programme (YEP) कॅम्पसाठी भारतातर्फे निवड झाली आहे.

NCC च्या महाराष्ट्र डायरेक्टोरेट मधून निवडला गेलेला तो एकमेव विद्यार्थी आहे. संपूर्ण भारतातून एकूण १२ कॅडेटची या कॅम्पकरिता निवड करण्यात आली. ही निवड प्रकिया दिल्लीला प्रजासत्ताक दिनाच्या परेडमधून सुरू होते. कुणालची प्रथम निवड RDC व Prime Minister Rall साठी झाली व त्यानंतर लेखी परीक्षा. गटचर्चा स्कॉड हॅन्डलींग ड्रील व मुलाखत अशा चाचण्यांमधून तो सर्वात अव्वल ठरल्याने निवडला गेला. संपूर्ण भारतातून निवडल्या गेलेल्या १२ जणांत कुणालचा समावेश झाला.

• तृतीय वर्ष जैवतंत्रज्ञान शाखेत शिकत असलेल्या कु. चिन्मयी शुक्ल व आदित्य छत्रे या दोन विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली मोहोर उठवली आहे. या दोन विद्यार्थ्यांनी २८ व्या ''डॅनिश यंग सायंटिस्ट फेअर ॲन्ड कॉन्टेस्ट'' मध्ये "Biodegradation of Low Density polyethylene Plastic" या विषयावर आपले संशोधन सादर केले व ते तृतीय क्रमांकाचे विजेते ठरले.

---

कुणी चांगले म्हणावे म्हणून काम करू नका, आपण करीत असलेल्या कामाने अनेकांचे भले होणार असल्यास ते काम सोडूच नका.

## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**विद्यापीठ परीक्षा**

विद्यापीठाच्या वेळापत्रकाप्रमाणे दि. २५ मे २०१६ पर्यंत Sem. II, IV & VI विधीच्या परीक्षा घेण्यात आल्या. सेंट्रल असिसमेंट प्रोग्राम महाविद्यालयात व्यवस्थितरित्या चालू आहे.

**ॲडहॉक बोर्ड ऑफ स्टडीज फॉर लॉ :**

मुंबई विद्यापीठाने सर्व शाखांच्या अभ्यासासाठी ॲडहॉक बोर्ड ऑफ स्टडीजची स्थापना केली आहे. त्यापैकी विधी शाखेच्या समितीवर प्रभारी प्राचार्या श्रीविद्या जयकुमार ह्यांची निवड झाली आहे.

**LLB/BIS च्या अभ्यासाक्रमातील मराठी पुस्तकांच्या उपलब्धतेबाबत समिती :**

LLB/BIS च्या अभ्यासक्रमातील मराठी पुस्तकांच्या उपलब्धतेचा अभ्यास करून त्याबाबत माननीय मंत्री महोदय उच्च व तांत्रिक अभ्यासक्रम ह्यांच्याशी चर्चा करून सदर समस्या सोडविण्यासाठी, माननीय कुलगुरू मुंबई विद्यापीठ ह्यांच्याद्वारे एका समितीची स्थापना करण्यात आली आहे. प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार ह्यांची सदर समितीवर न्यू लॉ कॉलेजचे प्राचार्य एन. एम. राजाध्यक्ष ह्यांच्या अध्यक्षतेखाली समिती सदस्य म्हणून निवड करण्यात आली.

**प्राचार्य पदः**

प्राचार्यांच्या रीक्त पदासाठी दि. ३१ मार्च, तसेच ४, ५ व ६ एप्रिल रोजी जाहिरात देण्यात आली. त्या संदर्भात विद्यापीठ निवड समितीची दि. २५ मे २०१६ रोजी बैठक झाली असून ह्या संबंधित अहवाल विद्यापीठाच्या CONCOL विभागाला पाठवण्यात आला आहे.

•••

## प्रेरणा देणाऱ्या पौर्णिमा

**चैत्र पौर्णिमा** - आंब्याची डाळ, कैरीचे पन्हे, चैत्र गौरीच्या प्रसादाबरोबर साजरी होणारी. हनुमान जयंती, सेवक कसा असावा याची शिकवण देणारी. बलवान होऊन जीवन जगा असा संदेश देणारी.

**वैशाख पौर्णिमा** - बौद्ध पौर्णिमा सत्य, अहिंसा, प्रेम याची शिकवण देणारी.

**ज्येष्ठ पौर्णिमा** - 'वट पौर्णिमा' पतीच्या दीर्घायुष्याचे दान मागायला शिकवणारी प्रेरणा देणारी त्याग करायला शिकवणारी.

**आषाढ पौर्णिमा** - व्यासांचे पूजन करणारी. गुरूबद्दल आदर व्यक्त करण्याची शिकवण देणारी.

**श्रावण पौर्णिमा** - राखी पौर्णिमा, नारळी पौर्णिमा, सगळी एकाच पौर्णिमेची नावे. भावा बहिणीच्या प्रेमाचा अतूट धागा रक्षाबंधनाचा दिवस. नातेसंबंध जपण्याची शिकवण मिळते. समुद्राला नारळ अर्पण करून त्याच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस निसर्गाची आठवण देणारी नारळी पौर्णिमा.

**भाद्रपद पौर्णिमा** - श्रीगणेशाचे पूजन करून सर्वांना सुख समृद्धी देण्याची प्रार्थना करून विसर्जन करण्याचा दिवस.

**अश्विन पौर्णिमा** - कोजागिरी पौर्णिमा शांत, शितल, यशाचा मार्ग दाखवणारी.

**कार्तिक पौर्णिमा** - श्रीशंकराच्या मंदिरात त्रिपूरवाती लावायला प्रेरीत करणारी. मुलाचे दीर्घायुष्य, सुखाचे, यशाचे होवो अशी प्रार्थना करणारी मायाळू आई याच पौर्णिमेला भेटते.

**मार्गशिर्ष पौर्णिमा** - ब्रह्मा, विष्णू, महेश या तिन्ही देवांचे एकत्रित रूप श्रीगुरुदेव दत्त जयंती, जन्म दिवस. तिन्ही देवांना एकत्रित प्रार्थना करायला लावणारी.

**पौष पौर्णिमा** - शाकंभरी पौर्णिमा. महाकाली, महासरस्वती, महालक्ष्मी वाईटाचा संहार करणारी व उपासनेचा मार्ग दाखवणारी माता माउली हाच संदेश देणारी पौर्णिमा.

**माघ पौर्णिमा** - कुळधर्म, कुळाचार, पूजा याची आठवण करून देते. कुटुंबाच्या कल्याणाबरोबर समाजाचे हित करा अशी प्रेरणा देणारी पौर्णिमा

**फाल्गुन पौर्णिमा** - होळी रे होळी, पुरणाची पोळी म्हणत रंगांची उधळण करीत येणारी पौर्णिमा. वाईट गोष्टीचा मारा करून आनंदाने जगा असा आशीर्वाद देणारी मराठी वर्षाचा शेवट करणारी पौर्णिमा.

अशा या प्रत्येक महिन्याच्या पौर्णिमेच्या विविध संदेशांमुळे रुढी, परंपरामुळे आत्मसात केलेल्या ज्ञानामुळे आपले आयुष्य सुंदर समृद्ध होते.

**- संकलित**

(पृष्ठ क्र. २ वरून - **संपादकीय**)

'विचार'ही मराठीतूनच व्हायचा आणि तो 'व्यक्त' ही मराठीतूनच करायचा. आठवी ते अकरावीचे इंग्रजी हे इंग्रजी वाचण्यापुरते आणि समजण्यापुरते मर्यादित होते. महाविद्यालयात मात्र 'माध्यम'च नाही तर पुस्तकापासून परीक्षाही इंग्रजी मधून द्यावी लागे. या फरकामुळे त्या पिढ्यांमध्ये माध्यमांबद्दल प्रचंड गोंधळ निर्माण झाला, आणि तो साहजिकच नैसर्गिक होता. माध्यमामुळे आपल्याला जे भोगावे लागले ते आपल्या पुढील पिढ्यांना भोगावं लागू नये ही भावना त्यातूनच निर्माण झाली. याच वेळेला स्वातंत्र लढ्यामध्ये ज्यांची मानसिकता तयार झाली आहे अशी शिक्षकांची पिढी हळूहळू निवृत्त व्हायला लागली. समानता, गरिबी, विषमता यांचे 'राजकीय' बुडबुडे याचवेळी निर्माण व्हायला लागले, आणि याच 'सामाजिक' व 'राजकीय' स्रोतातून शिक्षकांच्या नेमणुका व्हायला लागल्या. शिक्षकी 'पेशा' संपून 'व्यवसाय' म्हणून त्याला स्वरूप यायला लागले. पगारापासून कामाच्या तासापर्यंत सगळ्याच गोष्टी या औद्योगिक क्षेत्रातील कामगारांप्रमाणे शिक्षकांच्याही होऊ लागल्या. सरकारी क्षेत्रात नसले, तरी खाजगी क्षेत्रातील उद्योगधंद्यांमध्ये कामगाराला एका 'दर्जाचे' उत्पादन करून द्यावे लागते. कारण त्या दर्जावरतीच उद्योगधंद्याचे 'अर्थकारण' आणि 'प्रगती' अवलंबून असते. म्हणूनच पगार किंवा तत्सम कामगार सुविधा, आणि 'दर्जा' हे एकमेकांना पूरक असते. अगदी आजच्या 'शिकवणी वर्गा'सारखेच!

शिक्षणाच्या माध्यमाच्या बाबतीत आणखी एक बाब महत्त्वाची होती.

विज्ञान असो किंवा भाषा सोडून इतर कोणतेही विषय असोत, यांचा कायम विकास होत असतो. नवनवीन शोध औद्योगिक क्रांती मध्ये भर घालत असतात. त्यातूनच विज्ञान आणि त्याच्या पूरक शाखांची 'परिभाषा' निर्माण होत असते. भारतीय शिक्षण क्षेत्रामध्ये १९ व्या शतकाच्या मध्यापासून आमुलाग्र बदल व्हायला लागले. हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय असला तरी हे बदल फक्त शिक्षणाच्या माध्यमापुरते मर्यादित नव्हते, तर जीवनाच्या किंवा जगण्याच्या तत्त्वज्ञानाबद्दलही ते होते. कुटुंबापासून ते समाजरचनेच्या जडणघडणीत सुद्धा बदल होत होते. बदलती जागतिक परिस्थिती आणि वसाहतवादामुळे या बदलाचे सगळे 'स्रोत' हे 'पाश्चात्य' होते. विज्ञानाच्या समजुतींची घोडदौड ही त्याच्या 'अग्रभागी' होती. पारंपरिक विषय मागे पडून नवीन विज्ञान आणि नवीन समाजशास्त्र विकसित होत होते. वाढत्या माहितीच्या या प्रसारामुळे शिक्षणामध्ये नवीन शाखा निर्माण होत होत्या.

अमेरिका आणि इंग्लंड हे इंग्रजी माध्यमाचे देश यामध्ये आघाडीवर असले, तरी युरोप मधील फ्रान्स, जर्मनी, इटली, हॉलंड या लहान देशांचे योगदानही या विकासामध्ये मोठ्या प्रमाणावर होते. शिक्षणाच्या माध्यमांचा विचार करताना, विज्ञानाच्या संशोधनात इंग्रजी भाषेचे देश, आणि इंग्रजी भाषा न जाणणाऱ्या इतर देशांचे या संदर्भातले योगदान लक्षात घेणे फार महत्त्वाचे आहे. विज्ञानाच्या या सगळ्या प्रगतीमध्ये इंग्रजी भाषा नसलेले देश आपल्या भाषेमधून त्या विकासाची परिभाषा निर्माण करत होते. इंग्रजी काय किंवा फ्रेंच, जर्मन भाषा काय, ह्यांच्या बोलण्याच्या शैलीही प्रांताप्रमाणे बदलत असल्या, तरी त्या भाषांचे प्रमाणिकरण झाले होते. या प्रमाण भाषेंमधून त्यांचे अनेक शब्दकोश निर्माण होत होते. या सगळ्या भाषांचा सांस्कृतिक स्रोत असलेल्या 'ग्रीक' आणि 'लॅटीन' भाषेतील शब्द घेताना त्यांना कोणतीही 'अडचण' किंवा 'विरोध' झाला नाही. वैद्यकशास्त्र किंवा वनस्पती शास्त्रामध्ये लॅटीन शब्दांचा वापर आपण नकळतपणे सर्रास करतो, त्याला कोणाचाच आक्षेप नसतो.

कुठलीही भाषा ही 'बोली' भाषेच्या पलीकडे न्यायची असेल, निदान शिक्षणाकरिता, तर तिला 'प्रमाण'

भाषा होणे आवश्यक असते. भाषेच्या स्वतःच्या वैशिष्ट्याप्रमाणे अशी 'प्रमाण' भाषा ही व्याकरणाच्या सहाय्याने विकसित होते. त्यामध्ये 'सोपेपणा' किंवा 'कठीणपणा' हा प्रश्न नसतो. भाषेची 'शक्ती' ही ती भाषा नि:संदिग्धपणे अनुभव व्यक्त करू शकते का? यावर असते. कारण भाषा हे संपर्काचे साधन आहे. आपण काय बोलतो किंवा लिहितो हे तसेच्या तसे दुसऱ्याला समजणे फार महत्त्वाचे असते.

भारतीय मातृभाषा इथेच तोकड्या पडायला लागल्या. भाषेच्या तोकडेपणापेक्षा तिला विज्ञानाचे पारिभाषिक शब्द देऊ न शकणाऱ्या भाषा अभिमान्यांकडे तो दोष जास्त जातो. मराठी माध्यमांच्या शिक्षकांचा दर्जा हा जरी महत्त्वाचा विषय असला, तरी आजच्या मातृभाषेतून विज्ञानाच्या शिक्षणाकरिता समांतर परिभाषा, आणि अगदी शेवटच्या टप्प्याचे वैज्ञानिक शिक्षण देण्याचे साहित्य, मराठीत जो पर्यंत निर्माण होत नाही तिथपर्यंत अनुदान, इंग्रजीला नावे ठेऊन, किंवा फुकटेपणानी मराठी शाळा जगू शकणार नाहीत.

भाषेचे हे महत्त्व आपल्यावर राज्य करणाऱ्या 'साहेबां'नी केव्हाच ओळखले होते. म्हणूनच १९ व्या शतकात जेव्हा शिक्षण पद्धतीमध्ये बदल होत होते तेव्हा, भारताची 'सशक्त' प्रमाण भाषा 'संस्कृत', ते शिकायला लागले आणि शिकवायलाही लागले. त्यांच्या 'धर्म प्रसारकांनां' बायबलचे सगळ्याच भारतीय भाषेमध्ये भाषांतर करावयाचे होते. बायबलच्या मूळ वचनांचा अर्थ लावण्या करिता त्यांच्याकडे भाषाशास्त्र विकसित झाले होते, पण त्यांना सर्वात मोठा 'धक्का' बसला तो भारतामध्येही वेदांचा अर्थ कळण्याकरिता असलेल्या 'प्रगल्भ' शाखेचा विकास बघून.

वाराणसी हा भारतीय धर्मच नाही तर पारंपरिक विद्येचे माहेरघर आहे हे साहेबांच्या लक्षात आले होते. आपणही अशा ज्ञानाला पुरस्कार देतो हे दाखवण्याकरता इस्ट इंडिया कंपनीने १७९१ साली वाराणशीला संस्कृत महाविद्यालयाची स्थापना केली. पुढे इंग्रजी आणि पाश्चात्य विज्ञान शिक्षणाचा अभ्यासही त्याच कॉलेजमध्ये त्यांनी चालू केला. धर्म प्रसार हा त्यामागे हेतू होताच, पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे 'परंपरागत' भारतीय शिक्षणापेक्षा 'पाश्चात्य' विज्ञान श्रेष्ठ आहे हे त्यांना प्रस्थापित करायचे होते. या सगळ्या संघर्षाचा इतिहास हा शिक्षणाच्या दृष्टीने रंजक आणि महत्त्वाचा आहे.

जॉन मूर (John Mur), विल्किनसन (Wilkinson), जेम्स बॅलेनटाइन (James Ballentyne) यांनी विज्ञानाचे शिक्षण मातृभाषेतून आणण्याकरिता जो प्रयत्न केला त्याला इतिहासात तोड नाही. पाश्चात्य विज्ञान इंग्रजी मधून शिकवण्यापेक्षा संस्कृत मधून शिकविणे सहज शक्य आहे, आणि तसे शिक्षण जर का पंडितांनी घेतले, तर पाश्चात्य विज्ञानाचे ते पाईक तर बनतीलच, पण ख्रिस्ती धर्माचेही ते धर्मप्रसारक होतील हा त्यांचा ठाम विश्वास होता. अर्थातच अनेक पंडित पाश्चात्य विज्ञानात पारंगत झाले, पण ख्रिस्ती धर्मापेक्षा आपल्या स्वधर्माचेच ते अनुयायी राहिले.

संस्कृतची भाषा 'क्षमता', आणि त्यामधील याकरिता उपयुक्त असणारे साहित्य याचा वरील धर्मप्रसारकांनी अभ्यासच केला असे नाही, तर त्याची वैज्ञानिक परिभाषाही निर्माण करून त्यावरील पुस्तकेही त्यांनी लिहिली. आजही त्यांनी विज्ञानाकरिता त्यावेळी निर्माण केलेले पारिभाषिक शब्द आपण वापरतो. शिवाजी महाराजांनी भाषेचे हे महत्त्व ओळखून 'राज्य व्यवहार-कोष' बनविला होता. आपण मात्र सातत्याने असे पारिभाषिक शब्द वापरणे सोडाच, पण तसा कोणी प्रयत्न जरी केला तर त्याची टिंगलच करत राहिलो. 'थोडी विश्रांती' हा साधा सुटसुटीत मातृभाषेतील शब्द असूनही सर्व दूरदर्शन वाहिन्यांचा अजूनही 'ब्रेक' हाच शब्द हट्टाने वापरण्याकडे

आग्रह आहे. मराठी नाटक, सिनेमाची नावे इंग्रजीत!! भाषा शिक्षणाचे सर्वात मोठे 'साधन' म्हणजे 'प्रसार माध्यमे'. वृत्तपत्रे आणि वाहिन्यांचे मराठी वाचून आणि ऐकून वाचकाचे किंवा दर्शकाचे मराठी आणि इंग्रजी दोन्ही बिघडायला लागले आहे.

कुठलीही 'सभ्यता' किंवा 'संस्कृती'चा 'बोली'भाषेकडून 'प्रमाण' भाषेकडचा प्रवास हा खडतर असतो, कारण प्रमाण भाषा हे एक शास्त्र असते. मानवी अनुभव व्यक्त करण्याकरिता शब्दच नाही, तर शब्द समूहाची रचनाही तशी बांधायला लागते. भारताचे जगाला सर्वात मोठे योगदान म्हणजे 'संस्कृत' भाषा आहे. विज्ञानामध्ये प्रगती करणाऱ्या पाश्चात्यांनी संस्कृतची ही शक्ती ओळखली, पण शुद्ध 'जातीय' राजकारणात गुरफटलेल्या आपल्या समाजकारण आणि राजकारण्यांनी भाषेचे वेगळेच राजकारण निर्माण केले.

जेम्स बॅलेनटाइन यांनी न्यूटन, कोपरनिकस आणि इतर तत्कालीन पाश्च्यात विज्ञान पंडितांना समजावून सांगण्याकरिता न्यायदर्शनाचा वापर करून, १८५२ साली 'सिनॉपसीस ऑफ सायन्स फ्रॉम द स्टँडपॉइन्ट ऑफ द न्याय फिलोसॉफी' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकाच्या सुरुवातीच्या टिपे मध्ये त्यांनी मांडलेले विचार आजही तेवढेच मननीय आहेत.

"The Sanskrit college was designed to be a permanent institution, and it was not needed that I should deprecate the idea of foregoing in any degree the peculiar advantages offered by such an institution for the advancement of education in India - The proximate end, on which these peculiar advantage seemed capable of being brought effectually to bear, is the development of a language adequate to the reproduction of European thought, and the construction of a scientific literature rightly adapted to our educational purposes, by being in a form congenial to the Hindu mind, and free from barbarisms of speech. It was through the Sanskrit, I perceived clearly, that this must be effected; But it has never been contemplated that in the Sanskrit the results should remain locked up"

'उच्च' किंवा कुठल्याही 'व्यावसाईक' शिक्षणाच्या प्रवेशाकरता 'पात्रते'ची कसोटी ओलांडायला लागते. नोकरीकरताही दर्जा आणि पात्रतेचा विचार केला जातो. पण 'मंत्री' होण्याकरता यातील काहीच लागत नाही. कोणीही एकदा शिक्षणमंत्री झाला की, त्याला त्या आधीच्या सगळ्या शिक्षणपद्धती या 'भ्रष्ट' आणि 'कुचकामी' वाटायला लागतात. मग 'तळागाळातल्या', 'गरीब' लोकांच्या शिक्षणाकरता योजनांचा पाऊस पडायला लागतो. 'सवलत' आणि 'फुकट', 'व्यापक' आणि 'सर्वसमावेशक', 'पारदर्शक' आणि 'कार्यक्षम' अशा शब्दांची पेरणी करत, नापासांना पास होण्यापर्यंत संधी देण्याचे 'क्रांतिकारक' धोरण निर्माण होते. 'अपयश' हे जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. शिक्षण अपयश पचवण्याची ताकद देते. अपयशाची कारणमीमांसा करायला शिकविते. संस्कारक्षम वयामधील हा महत्त्वाचा संस्कारच जर काढून टाकला तर ही पिढी जीवनातील संघर्षाला कशी सामोरी जाणार?

डाव्या विचारसरणीमध्ये त्यांच्या सिद्धांतवादाचा एक भाग म्हणून सर्वच गोष्टींचे सरकारीकरण करण्याचा उपाय सुचविलेला असतो. सरकारी उद्योधंद्याप्रमाणेच बहुतेक सर्व सरकारी शाळा आणि महाविद्यालयातील सुमार दर्जा, प्रशासकीय बधिरता, आणि सर्व स्तरावर झिरपेला भ्रष्टाचार हा सर्वांनाच परिचित आहे. तरीही, महाराष्ट्रातील शिक्षणामध्ये प्रवेश, शुल्क, नोकऱ्या, अभासक्रम, परीक्षा यांचे सरकारीकरण कमी होते म्हणून की काय, आता शिक्षकांच्या नेमणूकाही सरकारी माध्यमातून होणार आहेत. 'सवंग' लोकप्रियता आणि 'मतपेटी'वर डोळा ठेऊन

केलेले हे सरकारीकरण भावी पिढ्यांचे प्रचंड नुकसान केल्याशिवाय राहाणार नाही. शाळेचा पहिला दिवस वाजत गाजत साजरा करण्याच्या 'शिक्षण बाह्य' प्रथांना सुरवात करून, सरकारीकरणाबरोबर शिक्षणाचे 'सैराटी'करणही आता पूर्ण होणार आहे.

२०१० साली डॉ. काकोडकर यांच्या आधिपत्याखाली उच्च शिक्षणाच्या संदर्भात मार्गदर्शन करण्याकरिता एक समिती नेमली होती. दुर्दैवाने त्यामध्ये सुचविल्या गेलेल्या व्यापक मुलभूत सिद्धांतांना 'बगल' देऊन, सोयीच्या शिफारशींच्या अंमलबजावणीचा प्रयत्न सध्या चालू आहे. 'विद्यार्थी केंद्रित' परीक्षांचे क्रांतीकारक 'निकाल' आता लागल्यावर, विद्यापीठही 'विद्यार्थी केंद्रित' करण्याच्या घोषणा होत आहेत. याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयांमध्ये आता निवडणूका होणार आहेत. अशा निवडणुकांमध्ये होणारे 'गैरप्रकार' आणि राजकीय 'गुंडगिरी'चा प्रादूर्भाव बघून या निवडणुका 'बंद' करण्यात आल्या होत्या. क्रांतिकारक महाराष्ट्रात मात्र 'नेतृत्व' गुणाला वाव देण्याकरता त्या पुन्हा घेतल्या जाणार आहेत. मध्यंतरीच्या काळात 'विमुला' आणि 'कन्हैया' यांचे प्रकरण झाले. या संदर्भात गृहमंत्री नायडू यांनी लोकसभेत सांगितले,-

They are all studying at a central university where public money is involved. So they must do justice to the cause and they must study, that's all. If they are interested in politics they can leave studies and join politics.

केंद्रात आणि महाराष्ट्रात एकाच पक्षाचे सरकार आहे. कदाचित महाराष्ट्रात अनेक पिढ्यांचे नुकसान झाल्यावर हेच सांगायला लागेल, पण तेव्हा नक्कीच खूप उशीर झालेला असेल!

भारताच्या सध्याच्या लोकसंख्येत तरुण पिढी मोठ्या संख्येने आहे. या निकषावर भारत हा जगातला सर्वात मोठा 'तरुण' देश ठरतो. ज्ञानाची वाढती क्षितिजे, आणि तरुणांच्या वाढत्या अपेक्षा ही दर्जेदार शिक्षणापुढील मोठी 'समस्या' आहे. या सगळ्या परिस्थितीचा ऊहापोह काकोडकरांच्या उच्च शिक्षणावर मार्गदर्शना करता नेमलेल्या अहवालात साकल्याने केला आहे. प्रवेशापासून शुल्कापर्यंत सर्व गोष्टींची चर्चा या अहवालात आहे. दर्जेदार शिक्षण देणारी विद्यापिठे निर्माण करायची असतील तर अहवाल सांगतो,

A hallmark of a word class university is its autonomous functioning with a flexible governance madel that can quickly respond to the needs of handling a new idea some what differently.Such a governance system must be exclusively peer driven and endowed with the liberal funding.

'शिकवणी वर्ग' काय किंवा 'मातृभाषे'तील शिक्षणाची आजची परिस्थिती काय, 'सरकारीकरण' आणि 'नियंत्रणा'मुळे यात बदल नक्की होईल, पण तो 'अधोगती'कडे झुकलेला, आणि महाराष्ट्रातील शिक्षण प्रकियेला अनेक दशके मागे नेणारा असेल.

**- डॉ. विजय बेडेकर**

●●●

**दिशासाठी**

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत. - संपादक**

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.